| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ५७ वा | शुक्रवार, दिनांक १५ मे २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयची लातूरमध्ये मोठी कारवाई

- खासगी क्लास चालकाच्या घरावर छापा
- सेवानिवृत्त प्राध्यापक सीबीआयच्या ताब्यात

## २१ जूनला होणार पुनर्परीक्षा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:** दरम्यान, ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द करण्यात आली होती. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने आता या परीक्षेची नवीन तारीख जाहीर केली आहे. २१ जून रोजी नीटची पुनर्परीक्षा घेतली जाणार आहे. पेपरफुटीमुळे वर्षभर मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे मोठे नुकसान झाले असून, शैक्षणिक वेळापत्रकही कोलमडले आहे. मात्र, सीबीआयच्या या धडक कारवाईमुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. आता लातूरमधील या छाप्यात नेमके काय निष्पन्न होते आणि आणखी कोणाची नावे समोर येतात, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.




देशभर खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे पुन्हा एकदा लातूरमध्ये शोधले जात आहेत. सीबीआयच्या पथकाने आज पहाटेच लातूर शहरातील सुतमील परिसरात एका खासगी ट्युशन चालकाच्या घरावर छापा टाकला असून, गेल्या अनेक तासांपासून तपासणी सुरू आहे. या कारवाईमुळे शिक्षण पंढरी मानल्या जाणाऱ्या लातूरमध्ये पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे.

### पहाटे ६ वाजल्यापासून कारवाई सुरू

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सीबीआयचे पथक शुक्रवारी पहाटेच संबंधित ट्युशन चालकाच्या निवासस्थानी धडकले. सकाळी सहा वाजल्यापासून घराची आणि महत्त्वाच्या कागदपत्रांची कसून तपासणी केली जात आहे. यामध्ये संशयित ट्युशन चालकाचे मोबाईल फोन, संगणक हार्ड डिस्क आणि विद्यार्थ्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या नोंदींची पडताळणी केली जात असल्याचे समजते.

### सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी सीबीआयच्या ताब्यात

तर लातूरमधील सेवानिवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना सीबीआयने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. दोन दिवसांपूर्वी लातूरमध्ये झालेल्या तपास आणि चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आली. कुलकर्णी हे चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले होते. NEET पेपर सेट करण्याच्या समितीत त्यांचा सहभाग असल्याची माहिती तपासातून समोर येत आहे. पुण्यात ब्युटी पार्लर चालवणाऱ्या मनीषा नावाच्या संपर्कात ते असल्याचेही समोर आले असून, त्याच धाग्यांवरून सीबीआयचे पथक लातूरपर्यंत पोहोचले. त्यानंतर कुलकर्णी यांची सखोल चौकशी करण्यात आली. लातूरमधील कैलास नगर येथील कुलकर्णी यांच्या घराला सध्या कुलूप असून त्यांचे कुटुंब पुण्यात राहत असल्याची माहिती आहे. सीबीआयचे दुसरे पथक अद्याप लातूरमध्ये ठाण मांडून असून, पुढील धागेदोरे आणि संभाव्य संपर्कांची तपासणी सुरू आहे.असे समजते.

### देशभरात आतापर्यंत ७ संशियतास अटक

नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत देशभरातून सात प्रमुख आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. यामध्ये नाशिकमधून शुभम, अहिल्यानगरमधून धनंजय, पुण्यातील मनीषा, जयपूरमधून मांगीलाल, विकास , दिनेश ल आणि गुरुग्राममधून यश व यांचा समावेश आहे. या संशयित आरोपींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आता लातूरमधील संशयितांची चौकशी केली जात आहे. तसेच, धनंजय याचा मित्र ओंकार शिंगोटे याची देखील पोलिसांकडून चौकशी करण्यात आली आहे.

### 'नीट' परीक्षा २०२७ पासून ऑनलाइन

वैद्यकीय प्रवेशासाठी घेतली जाणारी 'नीट' परीक्षा २०२७ पासून ऑनलाइन होणार आहे. २०२६ च्या परीक्षेत झालेल्या पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला असून २०२७ पासून नीट परीक्षा पूर्णपणे 'ऑनलाइन' पद्धतीने घेतली जाईल , अशी घोषणा केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आज केली.

# ३₹ प्रति लिटरने पेट्रोल-डिझेल महागले



**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था:** पेट्रोल आणि डिझेल प्रति लिटर ३-३ रुपयांनी महाग झाले आहे. दिल्लीत आता पेट्रोल ९७.७७ रुपये प्रति लिटरने मिळेल. डिझेलची किंमत ९०.६७ रुपये प्रति लिटर झाली आहे. नवीन दर आज १५ मे पासून लागू झाले आहेत. सुमारे २ वर्षांनंतर दरांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे.

### पेट्रोल-डिझेलच्या किमतीत वाढ का झाली?

या वाढीचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आहे. इराण आणि अमेरिकेतील युद्ध सुरू होण्यापूर्वी क्रूड ऑइलचे दर ७० डॉलर होते, जे आता वाढून १०० डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत.

क्रूडच्या किमती वाढल्याने तेल कंपन्या दबावाखाली होत्या. त्यामुळे कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. जर कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये दीर्घकाळ वाढ कायम राहिली, तर पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी वाढवल्या जाऊ शकतात.

पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्क १०-१० रुपयांनी कमी केले होते

यापूर्वी, सरकारने पेट्रोल आणि डिझेलचे दर स्थिर ठेवण्यासाठी विशेष उत्पादन शुल्कात १०-१० रुपयांची कपात केली होती. पेट्रोलवरील शुल्क १३ प्रति लिटरवरून ३ पर्यंत कमी करण्यात आले होते, तर डिझेलवरील शुल्क १० वरून शून्य करण्यात आले होते. केंद्र सरकारकडून एका लिटर पेट्रोलवर एकूण २१.९० रुपये उत्पादन शुल्क वसूल केले जात होते.

विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क कमी झाल्यानंतर ते ११.९० रुपये झाले होते. त्याचप्रमाणे, एका लिटर डिझेलवरील एकूण केंद्रीय उत्पादन शुल्क १७.८ रुपयांवरून ७.८ रुपयांवर आले होते. सरकारचा हा निर्णय पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर ठेवण्यासाठी होता. या निर्णयामुळे पेट्रोल-डिझेलचे दर वाढले नव्हते.

### इंधनाचा वापर कमी करा: पंतप्रधान मोदी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तेलंगणामध्ये एका कार्यक्रमादरम्यान पश्चिम आशियातील भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेऊन पेट्रोलियम उत्पादनांचा काळजीपूर्वक वापर करण्याचा सल्ला दिला होता.

# लातूर परिमंडळातील २६ हजार ३१४ वीजग्राहक झाले ऊर्जावान

## प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेत ९९ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत

**लातूर परिमंडळांतर्गत येणाऱ्या बीड जिल्हयातील ७ हजार ८६२ वीजग्राहकांनी आपल्या घरावर सौर ऊर्जा यंत्रणा बसवून २९.१ मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मीती केली आहे, तर धाराशिव जिल्हयातील ३ हजार ९१४ वीजग्राहकांनी आपल्या घरावर सौर ऊर्जा यंत्रणा बसवून १४.२३ मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मीती केली आहे. त्याचबरोबर सर्वाधिक प्रतिसाद हा लातूर जिल्हयातील वीजग्राहकांनी दिला असून जिल्हयातील १४ हजार ५३८ वीजग्राहकांनी आपल्या घरावर सौर ऊर्जा यंत्रणा बसवून ५६.२५ मेगावॅट क्षमतेची वीजनिर्मीती केली आहे.**

**लातूर/प्रतिनिधी:** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेला लातूर परिमंडळात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत २६ हजार ३१४ घरगुती वीज ग्राहकांनी आपल्या घरांच्या छतावर सौरऊर्जा प्रणाली बसवून विजेबाबत स्वावलंबी होत ऊर्जावान झालेले आहेत. या ग्राहकांच्या घरांच्या छतावर एकूण ९९.५८ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करून वीजबील शुन्यावर आणले आहे.

केंद्र सरकारकडून मिळणारे ७८ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान, ऑनलाइन प्रक्रिया आणि सुलभ कर्जसुविधा यामुळे या योजनेबाबत ग्राहकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. शहरी भागासह आता ग्रामीण भागातील वीजग्राहकही या योजनेचा लाभ घेत आहेत. केंद्र सरकारने फेब्रुवारी २०२४ मध्ये प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली. दरमहा ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी, तसेच अतिरिक्त वीज विकून उत्पन्न मिळावे, हा या योजनेमागील उद्देश आहे. या योजनेअंतर्गत घरांच्या छतावर १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रणाली बसविल्या जात असून त्यातून दरमहा अंदाजे १२० ते





३६० युनिटपर्यंत वीज निर्मिती शक्य होत आहे. ग्रामीण भागातील ग्राहकांनाही या योजनेचा मोठा लाभ मिळत आहे. या सौर प्रकल्पांतून निर्माण होणारी वीज ग्राहक स्वतःच्या वापरासाठी वापरू शकतात. गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्यास महावितरणकडून त्याची रक्कम संबंधित ग्राहकांच्या वीजबिलात समायोजित केली जाते. छतावरील सौर प्रकल्पातून सुमारे २५ वर्षे मोफत वीज उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे ३०० युनिटपर्यंत मासिक वीज वापर असणाऱ्या ग्राहकांसाठी ही योजना अत्यंत फायदेशीर ठरत आहे.

या योजनेचा लाभ घेण्यास ग्रामीण ग्राहकांना प्रोत्साहन देणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रोत्साहन निधीही देण्यात येणार आहे. योजनेत कार्यान्वित झालेल्या सौर प्रकल्पांतून निर्माण झालेली वीज ग्राहकांना वापरता येते. शिवाय ग्राहकाची गरज भागवून वीज शिल्लक राहिल्यास महावितरणकडून त्याची रक्कम संबंधित ग्राहकांच्या वीजबिलात समायोजित केली जात आहे. छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे. पीएम-सूर्यघर योजनेमुळे घरगुती ग्राहक जवळपास मोफत वीज मिळवत आहेत. शासनाचे अनुदान आणि महावितरणकडून ऑनलाइन सुविधा यामुळे ही योजना सर्वांसाठी सोपी आणि फायदेशीर ठरली आहे. त्याचबरोबर गृहनिर्माण संस्था, गृहसंकुलांसाठी विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन व सामायिक उपयोगासाठी ५०० किलोवॅटपर्यंत प्रति किलोवॅट १८ हजार रुपये असे कमाल ९० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. ३०० युनिटपर्यंत मासिक वीजवापर असणाऱ्या घरगुती वीजग्राहकांसाठी ही योजना अतिशय उपयुक्त आहे. तसेच सुमारे २५ वर्षे या सौर प्रकल्पांतून घरातील वीजवापरासाठी मोफत वीज उपलब्ध होणार आहे. पीएम-सूर्यघर योजनेच्या संकेतस्थळावर नोंदणी केल्यानंतर प्रकल्प बसवण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो. प्रकल्प बसविल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. वीज ग्राहकांना https://www.pmsuryaghar.gov. in या संकेत स्थळावर योजनेची सर्व माहिती उपलब्ध आहे.

## प्रभात किरणे

निर्मळ मी,पुण्यवान मी,दाखवती
कीर्तनकार देवा तुझे मुखी नाम,तुडुंब
भरती स्व खिसे,घर देवाच्या तूझ्याच
नावावर,भक्तांना लुबाडती तरी ही
भोळा भक्त देवा तुझा विस्वास ठेवती

- इंजि. नागनाथ कलवले, लातूर
९७६४७ ८८२८८

## कुजबुज

- डॉ. संजय जमदाडे



**क्युबा येथील पेट्रोल डिझेल संपले..? ब्लॅकआऊट... जाहीर**

## चिमटा दयाचा



जो व्यक्ती सर्व काही पैशाने
खरेदी करतो, त्या व्यक्तीला
पैशाच्या जोरावर कांहीही
करता येते !
हीच चर्चा लातूरात
का दिसते !!

### स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

# ७ लाख ९३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात अवैध गुटखा व तंबाखू विक्रीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखा, लातूर यांनी अत्यंत नियोजनबद्ध कारवाई करत महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला मोठ्या प्रमाणातील गुटखा, सुगंधित तंबाखू व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेले चारचाकी वाहन असा एकूण ७,९३,२००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करून एका आरोपीस ताब्यात घेतले आहे.

पोलीस अधीक्षक, लातूर श्री अमोल तांबे यांच्या आदेशानुसार, जिल्ह्यात अवैध धंदे, मादक पदार्थ, गुटखा व तंबाखू विक्रीविरोधात कठोर मोहीम सुरू असून अपर पोलीस अधीक्षक, लातूर श्री मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. सदानंद भुजबळ यांनी त्यांच्या पथकास गुप्त माहितीच्या आधारे प्रभावी कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार दिनांक १३ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंद्यांची माहिती काढून कारवाई करण्यासाठी लातूर जिल्ह्यात रवाना झाले होते.




दरम्यान दिनांक १३ मे रोजी उदगीर तालुक्यातील डिग्रस पाटी परिसरात सकाळी सुमारे १०.४० वाजण्याच्या सुमारास पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी स्वीफ्ट डिझायर कारमधून मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा विक्रीसाठी घेऊन जाणार आहे. माहिती खात्रीशीर असल्याने पोलिसांनी पंचांना सोबत घेऊन डिग्रस गावातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात सापळा रचला. काही वेळात संशयित वाहन क्रमांक MH-12KN-3966 हे येताना दिसताच पोलिसांनी वाहनास थांबवून चालकाची चौकशी केली. त्याने आपले नाव १)ओमकार नरसन नरहारे (वय २१ वर्षे), रा. हैबतपूर ता. उदगीर, सध्या रा. आष्टामोड ता. चाकूर जि. लातूर असे सांगितले. यानंतर वाहनाची सखोल तपासणी करण्यात आली असता वाहनामध्ये मोठ्या प्रमाणात महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा व सुगंधित तंबाखू आढळून आली. सदर वाहनामध्ये विमल पान मसाला गुटखा, व्ही-१ सुगंधित तंबाखू , वाहतूक करण्यासाठी वापरण्यात आलेली मारुती सुझुकी स्वीफ्ट डिझायर कार क्रमांक MH-12 KN-3966 - किंमत ४,५०,०००/- असा एकूण ७,९३,२००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी प्रतिबंधित गुटखा व तंबाखूची वाहतूक व विक्री करत असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.याप्रकरणी आरोपी ओमकार नरसन नरहारे याच्याविरुद्ध पोलीस स्टेशन उदगीर ग्रामीण येथे कलम १२३, २२३, २७४, २७५ भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, लातूर श्री. अमोल तांबे यांच्या निर्देशनाखाली,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक श्री. सदानंद भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली खालील पथकामधील मनोज खोसे, अर्जुन राजपूत,रियाज सौदागर, साहेबराव हाके, आनंद हल्लाळे यांनी केली अस लातूर जिल्हा पोलीस दलामार्फत अवैध गुटखा व तंबाखू विक्री करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही कठोर व प्रभावी कारवाई सुरू राहणार आहे.

# लातूर शहरात वाहतूक कोंडी; नागरिक त्रस्त, तातडीच्या उपाययोजनांची जोरदार मागणी




एआय ईमेज

**लातूर/प्रतिनिधी:** शहरातील अत्यंत गजबजलेल्या आणि राष्ट्रीय महामार्गाशी जोडलेल्या प्रमुख चौकात वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, याचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह रुग्ण, विद्यार्थी आणि प्रवाशांना बसत आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की, नागरिकांचा जीव धोक्यात येण्याची वेळ वारंवार येत आहे.

सदर चौक हा शहरातील मुख्य वाहतुकीचा केंद्रबिंदू असून राष्ट्रीय महामार्गाचा भाग असल्यामुळे अवजड वाहनांची सतत वर्दळ वाढली आहे. मोठे ट्रक, ट्रॅव्हल्स बसेस, तसेच काळी-पिवळी जीप या सर्व वाहनांची एकाच मार्गावरून होणारी वाहतूक नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र दररोज दिसून येत आहे. परिणामी, वाहनांच्या लांबलचक रांगा लागत असून, वाहतूक संपूर्णपणे ठप्प होत आहे.

याच परिसरात नामांकित बहुमजली रुग्णालये तसेच मोठ्या प्रमाणावर ट्युशन क्लासेस असल्यामुळे रुग्णवाहिका आणि शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वेळा रुग्णवाहिका देखील कोंडीत अडकून पडत असल्याने जीवितहानीचा धोका निर्माण होत आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## सकरात्मक विचाराची गरज

सध्याला जागतिक युद्धाची स्थिती पाहाता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला केलेले आवाहनाचा जनतेनी सकारात्मक विचार केला पाहिजे. अनेकजन विपरीत अर्थ लावत आहेत. वास्तविक शब्दला सकारात्मक का नकारात्मक ओळीत कटीबद्ध करायाचा हा ज्यांचा त्यांचा अधिकार आहे. जे उघड आहे. सर्वांना दिसते किंवा कळते आहे अशा बाबीवर हस्यास्पद मत व्यक्त करणे योग्य नाही. तेलाचा बादशहा इराण आहे. जे जगाला माहिती आहे. अशा तेलजन्य देशावर अमेरिकेने इस्त्राईलच्या खांद्यावर बंदुक ठेवून युद्ध व हल्ले केले आहेत. अजूनही या दोघामधे युद्ध समाप्तीची अधिकृत घोषणा झाली नाही. भारताला काय जगाला इंधनाचा तुटवडा जाणवत आहे. अशा स्थितीत भारतीय जनतेला जे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काटकसरीने वागण्याचे आवाहन केले आहे. याला प्रतिसाद द्यायचा का नाही हा ज्यांचा त्यांचा विचार आहे. पंतप्रधान यांनी जागतिक परिस्थितीचा विचार करून आवाहन केले आहे. वास्तविक परिस्थितीत अशी आहे की, इंधन म्हणजे पेट्रोल, डिझेल व गॅस जेथून येतो तेथे युद्धाची परिस्थिती आहे. इंधन आणणे कठिण आहे. असे असताना पर्याय म्हणून भारत विचार करीत आहे. मात करण्याचा प्रयत्न करीत आहे. देशातील नागरिकांना या संकटाची अधिक झळ बसू नये म्हणून काही काळजी घेणे अपेक्षित आहे याचीच आठवण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करून दिली आहे. या बाबत सर्वसामान्यांपने विचार केला तर एक बाब लक्षात येते ती म्हणजे, इंधनाची बचत करावी लागेल. यासाठी पेट्रोल,डिझेल कमी वापरावे लागेल. गाड्याचा ताफा कमी करावा लागेल. काही नियम आपणच आपल्यावर लागू करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देशात इंधनाचा गंभीर तुटवडा नाही. आगामी काळात भासू शकतो. हे लक्षात घेता आतापासून या बाबत काटकसर करणे आवश्यक आहे. याची सुरवात आता मंत्रीमहोदयांनी करण्यात सुरू केली आहे. वास्तविक भला मोठा गाड्याच्या ताफ्याची गरज नाही. परदेशिय दौरा करण्याची तशी गरज नाही. अति गाड्या वापरण्याची गरज नाही. आता पंतप्रधनाच्या आवाहनास किती साथ द्यायची किंवा नाही हे ज्यांनी त्यांनी ठरविण्याची गरज आहे. संकट तर दरवाज्यासमोर उभा आहे. मात करायाची का नाही याचा विचार केला पाहिजे. विनाकारण टिंगल करणे योग्य नाही. जे नकारात्मक विचार व्यक्त करीत आहेत यांनी पर्याय सुचावावा. काय केल्याने यावर मात करता येईल हे तरी सांगावे. तसे आपल्यादेशात होत नाही. सुचना केल्यावर त्याचा शोधून विर्यास्त अर्थ शोधण्यात पटाईत मंडळी आहे यात दुमत नाही. इंधन आणावयाचे कोठून? जगात एकमेक इराण हा खणीज तेलाचा देश आहे. ज्या बेटातून तेलाचे जहाज येत आहे तो हॉर्मुझ भागमधून जहाज पास होणे आवघड आहे. इराणचा ताबा आहे तर अमेरिका या भागातून जहान घेवून जाण्यास मज्जाव करीत आहे. अशा स्थितीत भारतीयांनी विचारपुर्वक पावले उचलली पाहिजे. इंधनाचा वापर करू नका असे म्हटले नाही तर काटकसरीने वापर करावा असे आवाहन केले आहे. आजही काहीजन सकारात्मक विचाराने चालत आहेत तर काही अविचाराने वागत आहे. आज खरीच स्वयंपाकाच्या गॅसची टंचाई आहे का? अन्न शिजविण्यासाठी गॅसचा वापर होतो तो चालू आहे. बंद असे नाही तरी ओरड होते हे योग्य नाही. मुळात काटकसर करणे म्हणजे बचत आहे. हे लक्षात घेता वापर करा मात्र विचारपुर्वक काटकसरीने करावा हा उद्देश आहे. यात कोणाचेही बिघडले नाही. इंधनाचा वावर बंद केला जाणार नाही. एक सवय लागली आहे की, गाड्याचा वापर मनसोक्त केला गेला आहे. आता इंधनाच्या संकटामुळे काटकसर करावे असे आवाहन केले गेले आहे ते आवघड होत आहे. सोन्या बाबत तसेच आहे. सोने जीवनाश्यक बाब नाही. सोने खरेदी नाही केल्यास मोठे संकट येणार नाही. उपाशी राहाणार नाही. गॅसशिवाय अन्न शिजविणे आवघड आहे. तसे सोन्या बाबत नाही. त्यामुळे पंतप्रधान यांनी केलेले आवाहन कळकळीचे आहे त्यामुळे सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे. टिंगल करणे तसे योग्य नाही. जागतिक संकट आहे. जो पर्यंत अमेरिका माघार घेणार नाही तो पर्यंत संकट अटळ आहे. मुळात लादलेले युद्ध आहे. महासत्ताधिश बरोबर जगच आपल्या ताब्यात राहावे असा मनोदय अमेरिकेचे दिसून येत आहे. अमेरिका व चीन बरोबरचे संबंध चांगले नसताना ट्रम्प चीनच्या दौऱ्यावर गेले. मित्रत्त्वाची हाक दिली आहे, ही किती प्रामाणिक आहे याचा विचार केला पाहिजे. ट्रम्प यांचे कोणाबरोबर पटत असेल असे वाटत नाही. असे जरी असले तरी आज इंधन संकट अमेरिकेच्या धोरणामुळे निर्माण झाले आहे हे मान्यच केले पाहिजे. वरचेवर संकट कमी होणार नाही असे दिसून येत आहे. भारतात तर तेलाच्या विहीरी नाहीत. या बाबत जगच परावलंबी आहे. त्यामुळे जो पर्यंत युद्ध संपणार नाही तो पर्यंत काळजीचे कारण आहे. काटकसर करावीच लागणार आहे. त्याच प्रमाणे इंधन संकट अटळ आहे. एक तर काटसरीने वापर केला तर चार दिवस तेवढेच भागणार आहे. संकट आहे का तर आहे हेच उत्तर कोणीही देणार आहे. त्यामुळे पंतप्रधानाचे आवाहन तसे विचारपुर्वक आहे. यावर विचार करून अमल केला पाहिजे. केवळ विचार करून चालणार नाही. सध्याला तुर्त सोने खरेदी करू नका म्हटल्याने टिंगल होत आहे. मुळात जागतिक आर्थिक संकटावर काही तरी पर्याय शोधलाच पाहिजे. विनाकारण वेळ घालविणे योग्य नाही. या समस्यावर सकारात्मक विचाराची गरज आहे हे लक्षात घेता सर्वांनी मिळून मार्ग काढणे आवश्यक आहे. नसता आज पाकिस्तान सारखी स्थिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याला विचार केला तर युद्ध समाप्तीकडे पावले पडत नाहीत. किती दिवस समाप्तीस लागतील हे सांगता येत नाही. त्यामुळे काटकसर म्हणजे बचत आहे हाच विचार घेवून वाटचाल करावी लागेल. सकारात्मक विचाराने संकटावर मात केली पाहिजे.

# सोमनाथ पर्व: भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, साधना आणि आध्यात्मिकतेचे प्रतीक



भारतीय संस्कृती ही सण, उत्सव आणि धार्मिक परंपरांनी समृद्ध अशी संस्कृती आहे. भारतातील प्रत्येक सणामागे एखादी आध्यात्मिक भावना, नैतिक संदेश किंवा सामाजिक मूल्य दडलेले असते.

१७८३ मध्ये इंदूरच्या राणी अहिल्यादेवी होळकर यांनी सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराचा निर्णय घेतला. शेकडो वर्षे भग्नावस्थेत असलेले मंदिर त्यांनी स्वखर्चाने पुन्हा उभे केले. या मंदिराचा इतिहास आक्रमण, पुनर्बांधणी, आत्मसन्मान आणि राष्ट्रीय पुनर्जागरण यांचा मेळ आहे. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' (२०२६) मधील या पर्वामुळे सोमनाथच्या इतिहासाला नवा उजाळा मिळाला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सोमनाथच्या विकासाला गती मिळाली असून, हे स्थान केवळ एक मंदिर नसून भारताच्या सामर्थ्याचे केंद्र बनले आहे.

आपल्या संस्कृतीतील विविध पर्वांपैकी सोमनाथ पर्व हे भगवान शंकराच्या उपासनेशी संबंधित एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र पर्व मानले जाते. सोम म्हणजे चंद्र आणि नाथ म्हणजे स्वामी, म्हणजेच चंद्राचे स्वामी असा त्याचा अर्थ होतो.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, संयम आणि अध्यात्म यांचा संगम मानले जाते. या पर्वाद्वारे भक्त भगवान शंकराची आराधना करून जीवनातील दुःख, संकटे आणि नकारात्मकता दूर करण्याची प्रार्थना करतात. या दिवशी मंदिरांमध्ये विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, भजन, कीर्तन आणि रुद्रपाठाचे आयोजन केले जाते.

सोमनाथ पर्व हे आपल्याला संयम आणि साधनेचे महत्त्व शिकवते. उपवास हा केवळ अन्नत्याग नसून मन आणि शरीर शुद्ध ठेवण्याचा मार्ग आहे. उपवासामुळे मनावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता वाढते. राग, मत्सर, लोभ आणि अहंकार यांसारख्या नकारात्मक भावनांवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. म्हणूनच भारतीय संस्कृतीत उपवासाला आध्यात्मिक साधनेचे महत्व दिले गेले आहे.

या पर्वाच्या निमित्ताने अनेक ठिकाणी महाप्रसादाचे आयोजनही केले जाते. समाजातील सर्व स्तरातील लोक या धार्मिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढण्यास मदत होते. सोमनाथ पर्व हे निसर्गाशी असलेल्या भारतीय संस्कृतीच्या नात्याचीही आठवण करून देते.

शिवपूजेमध्ये वापरली जाणारी बेलपत्रे, पाणी, दूध, धतूरा आणि फुले ही निसर्गातीलच देणगी आहेत. यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यातील परस्पर संबंध अधोरेखित होतो.

आजचे जीवन अत्यंत धावपळीचे आणि तणावपूर्ण झाले आहे. स्पर्धा, कामाचा ताण आणि मानसिक दबाव यांमुळे अनेक लोक चिंताग्रस्त झालेले दिसतात. अशा परिस्थितीत धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरा मनाला शांतता देण्याचे कार्य करतात. सोमनाथ पर्वासारखे सण माणसाला आत्मचिंतनाची संधी देतात.

सोमनाथ पर्वाचे सामाजिक महत्वही तितकेच मोठे आहे. या पर्वाच्या निमित्ताने लोक एकत्र येतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि सामाजिक ऐक्य दृढ करतात. भारतीय संस्कृतीत 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. म्हणजेच संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे. धार्मिक सण आणि पर्व ही भावना अधिक दृढ करतात. समाजात प्रेम, सहकार्य आणि परस्पर आदर वाढवण्याचे कार्य हे पर्व करतात.

भारतीय संस्कृतीतील सण-उत्सव हे केवळ मनोरंजनासाठी नसून संस्कारांचे माध्यम आहेत. लहान मुलांना धार्मिक कथा, परंपरा आणि संस्कृतीची ओळख अशा सणांमधूनच होते. भक्ती, प्रामाणिकपणा, संयम आणि चांगले आचरण यांचे महत्त्व यावर चर्चा होते, त्यामुळे पुढील पिढीपर्यंत सांस्कृतिक वारसा पोहोचण्यास मदत होते.

सोमनाथ मंदिरालाही भारतीय इतिहासात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. गुजरातमधील प्रभास पाटण येथे असलेले सोमनाथ मंदिर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. या मंदिराचा इतिहास अत्यंत गौरवशाली आहे. अनेक आक्रमणांमध्ये हे मंदिर उद्ध्वस्त झाले, परंतु प्रत्येक वेळी ते पुन्हा उभे राहिले. यामुळे भारतीय संस्कृतीची जिद्द, श्रद्धा आणि पुनरुत्थानाची शक्ती दिसून येते. सोमनाथ मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय अस्मिता आणि सांस्कृतिक अभिमानाचे प्रतीक आहे.



– माधुरी मिसाळ,
राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग

सोमनाथ पर्व आपल्याला जीवनातील अडचणींवर मात करण्याची प्रेरणा देते. जीवनात कितीही संकटे आली तरी धैर्य, संयम आणि श्रद्धेच्या बळावर त्यांचा सामना करता येतो, हा संदेश या पर्वातून मिळतो. भगवान शंकराचा साधेपणा, त्याग आणि करुणा हे गुण प्रत्येकाने आत्मसात करण्यासारखे आहेत.

आजच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अनेक लोक आधुनिकतेकडे झुकत असले तरी भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक मूल्यांचे महत्त्व अजूनही कायम आहे. आधुनिक जीवनशैलीसोबतच संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृती ही समाजाची ओळख असते. आपल्या परंपरा जपल्यामुळे समाजात नैतिक मूल्ये टिकून राहतात.

सोमनाथ पर्व हे श्रद्धा, भक्ती, आत्मशुद्धी आणि सामाजिक ऐक्य यांचे प्रतीक आहे. हे पर्व माणसाला सकारात्मकतेचा मार्ग दाखवते. आपल्या मनातील वाईट विचार दूर करून सत्य, प्रेम आणि शांततेच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. भारतीय संस्कृतीतील ही परंपरा आपल्या जीवनाला आध्यात्मिक समृद्धी प्रदान करणारी आहे.

अशा पवित्र पर्वांच्या माध्यमातून समाजात चांगले संस्कार निर्माण होतात, मानसिक शांतता लाभते आणि सांस्कृतिक वारसा जपला जातो. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सोमनाथ पर्व हे केवळ धार्मिक उत्सव नसून मानवी जीवन अधिक सुंदर, शांत आणि समृद्ध बनवणारे प्रेरणादायी पर्व आहे.

# निवृत्तीनंतरचे नाते : तक्रारीचे ओझे टाकून आठवणीचे गाठोडे बांधा

रविवारचा दिवस. संध्याकाळचे सात वाजले होते . मी नेहरूनगरच्या शासकीय मैदानावरून घरी येण्याच्या तयारीत होतो. तेवढ्यात एका निवृत्त शासकीय अधिकाऱ्याने मला थांबवले ते महसूल सारख्या खात्यातून अव्वल कारकून पदावरून निवृत्त झाले होते. त्यांची पत्नीही शासकीय सेवेत होती तीही निवृत्त आहे. त्यांचे स्वतःचे ३५ हजार व पत्नीचे ४० हजार असे एकूण ७५ हजार दरमहा त्यांना पेन्शन मिळते. त्यांना दोन मुले, उच्च शिक्षित, नोकरीला. घरात एक नातू, दोन नातींचा किलबिलाट. वरून पाहता सुखाचा संसार !

तो सांगू लागला, रावसाहेब ( महसूल खात्यातील आदरार्थी संबोधन ) मी ४० / ४२ वर्षांपूर्वी आई वडिलांसाठी, भावासाठी तसेच सासरसाठीही पैसा खर्च केला. म्हणून आज माझी बायको रोज भांडते. मी काय पाप केलं ? आत्महत्या करू का आता?

हे सांगताना त्याच्या डोळ्यात पाणी होते. आवाजात कंप होता. ७२ व्या वर्षी गुडघेदुखीने त्याला चालता येत नाही आणि घरात पत्नीच्या टोमण्यांनी जगणं नकोसं झालंय. आई वडील २६ वर्षांपूर्वीच जग सोडून गेले. उमेदीत त्यांना दवाखाना, भावाला मदत, आज त्याच गोष्टी काढून पत्नी गेली वर्षभर भांडते आहे. मरून जा म्हणते मी पण रेल्वे खाली पडू का? एका कर्तृत्वान सुसंस्कृत माणसाच्या तोंडून हे शब्द ऐकून मी सुन्न झालो. हा एकट्याचा प्रश्न नाहीं. आज हजारोंच्या घरात हेच चित्र आहे.

निवृत्ती नंतरची पोकळी, एकटेपणा आणि संवादाचा अभाव यामुळे अनेक घरात आज साठी नंतरचे वाद पेटलेले दिसतात.

*भूतकाळाचे ओझे वर्तमानाचा आनंद का हिरावतो.?*

आपला समाज त्यागाला पूजतो. पण हिशेब मांडायला लागला किंवा, नाती दुभंगतात. त्या मित्राने ऐन उमेदीच्या काळात आई वडिलांसाठी, भावासाठी आणि त्याच्या मुला मुली साठी जे केले ते कर्तव्य होते. रक्ताच्या नात्यासाठी केलेली मदत ही गुंतवणूक नसते की, जिचा परतावा मागायचा. आज आई वडील हयात नाहीत, भावाचे कुटुंब स्थिर आहे. मग ४० / ४२ वर्षांपूर्वीच्या गोष्टी आजच्या भांडणाचे कारण कशा होऊ शकतात .?

याबाबत एका प्राध्यापक मित्राने सांगितलेली गोष्ट आठवली. ते म्हणाले होते की, मानस शास्त्र सांगते की, निवृत्ती नंतर माणसाकडे वेळ भरपूर असतो पण व्यस्तता नसते. मग मेंदू जुन्या फायली उघडतो. तेंव्हा असे व्हायला नको होते, मीच का नेहमी झुकतो. हे विचार नेहमी विष पेरणी करतात. विशेषतः स्त्रियांना वाटते की, नवऱ्याने माहेर पेक्षा सासर ला जास्त दिली. हा तुलनेचा रोग संसार पोखरतो.

*एका शिपायाची गोष्ट -- वेळेत शहाणपण शिकवणारी*.

शासकीय सेवेत एक शिपाई होता . सेवेत असताना साहेबांचा लाडका, वेळेत ऑफिस, सर्वांची कामे, घरी यायला वेळच नाही. निवृत्त झाला आणि चित्रच पालटले. दिवसभर घरीच थांबायचा, पत्नीला ते खटकू लागले. तू घरात नको, मरून जा असे रोज टोमणे. तो शांत पणे म्हणाला,' ठीक आहे, मी मरतो. माझे उरलेले आयुष्य तुलाच मिळू देत.'

*काळाने सूड घेतले.*

कांही दिवसात तो खरचं गेला. आज पत्नी पॅरालिसिस ने अंथरुणावर आहे. हाक मारली तरी मुलं, सुना काम सोडून येत नाहीत. आता तीच मयत नवऱ्याला शिव्या देते, मला एकटीला टाकून गेलास.

ही गोष्ट काल्पनिक नाही. अशी शेकडो उदाहरणे समाजात आहेत. जोडीदार हाच खरा सोबती असतो. मुले त्यांच्या संसारात गुंततात. नातवंडे मोठी होऊन उडून जातात. नवरा बायकोने एकमेकांना सांभाळले नाही तर वृद्धापकाळ नरक होतो.

*पेन्शन म्हणजे निवृत्ती नव्हे, नव्या इनिंग ची सुरुवात.*

शासन दोघांनाही पेन्शन देते. सन्मानाने जगण्यासाठी! महिना ७५ हजार रुपये येणाऱ्या घरात पैशाचा प्रश्न नाही, प्रश्न आहे मानाचा ! या वयात नातवंडा सोबत वेळ घालवा, समाज कार्य करा, आवडते छंद जोपासा. डॉक्टर सांगतात वयाच्या साठीनंतर राग, तणाव, भांडण यामुळे बी. पी., शुगर, हार्टअटॅक चे प्रमाण वाढते. आनंदी राहणारे जोडपे १० वर्षे जास्त जगते . मग जुन्या हिशेबासाठी आयुष्य पणाला का लावायचे ?

*पुरुषांनी लक्षात ठेवावे - निवृत्ती म्हणजे घरात साहेबगिरी नाही.*:

नोकरीत हुकूम सोडायची सवय असतें. निवृत्ती नंतर घर हेच ऑफिस वाटते. हे आण, ते कर सांगणे, टी. व्ही. रिमोट ताब्यात घेणे, स्वयंपाक घरात नाक खूपसणे याने वाद होतात. ४० / ४५ वर्षे संसाराचा गाडा बायकोने एकटीने ओढला. आता तिला मदत करा. पण मालक होऊ नका. भाजी निवडणे, नातवंडांना शाळेत सोडणे यात कमीपणा नाही, भांडे रॅक वर लावणे, झाडून काढणे, पाणी भरणे, किचन कट्टा साफ करून देणे, थोडक्यात सांगायचे तर ऑपरेशन पूर्व सर्व तयारी करून देणे, भूक लागल्यावर स्वतःचे हातानी वाढून घेऊन जेवण करणे वगैरे. यात कमी पणा नाही. तो प्रेम आहे.

*स्त्रियांनी समजून घ्यावे : तो 'बाहेरचा ' नाही ' घरचा ' आहे.*

नवरा दिवसभर घरात असतो म्हणजे स्वातंत्र्य गेले ही भावना अनेक स्त्रियांना छळते. पण ४० वर्षे तोही तुमच्यासाठीच राबला. सकाळी दहा ते सहा ऑफिस, तुमची व मुलांची स्वप्नं पूर्ण करण्यासाठी! आता त्याला तुमची गरज आहे. त्याने आई वडिलांसाठी, भावासाठी जे केलं तो त्याचा मोठे पणा होता. तुमच्या माहेर साठी पण कांहीतरी केलायचं ना? त्याकडे तुम्ही दुर्लक्ष करू नका. आज त्यांची टोमणे मारून अवहेलना करणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेणे.

*उपाय काय ? -- संवाद, सहवास, सहकार्य हा त्रिवेणी संगम.*

१ *जुने हिशेब फाडून टाका* -- घरात एक माफी पेटी ठेवा. राग आला की कागदावर लिहून त्यात टाका. आठवड्याला दोघांनी मिळून पेटीतील तुम्ही टाकलेली कागद जाळून टाका. भूतकाळ राख होईल.

२ *आपली वेळ ठरवा.*-- रोज संध्याकाळी एक तास फक्त दोघांचा. टी. व्ही. बंद, मोबाईल बंद फक्त गप्पा, फक्त जुन्या चांगल्या आठवणी, चहा.

३ *तडजोडीचे नव्हे, समजुतीचे नाते.*-- तू बरोबर, मी चूक हा वाद संपवा. आपण दोघे बरोबर हे सूत्र स्वीकारा.

४ *आर्थिक पारदर्शकता पण स्वातंत्र्य* -- पेन्शन एकत्रित खर्च करा. पण दोघांनाही थोडी पाकीट मनी द्या. त्याने मित्रा सोबत चहा प्यायला, तिने मैत्रिणी सोबत भिशी लावली पाहिजे.

५ *डॉक्टर नव्हे हमसफर बना* -- एकमेकांची औषधे लक्षात ठेवा . डॉक्टर कडे सोबत जा. मी आहे ना? हे औषधा पेक्षा मोठे आहे.

*समाजाने काय करावे.* -- जेष्ठ नागरिक संघ, महिला मंडळे यासारखी संस्थानी,' निवृत्ती नंतरचे समुपदेशन ' शिबीरे घ्यावीत. वाद होण्याआधी संवाद शिकवला पाहिजे. लग्नाच्या २५ / ३० वर्षानंतर प्रत्येक जोडप्याने पुनः एकदा सप्तपदी घेतली पाहिजे . यावेळी सात वचने असतील ती संवाद, सहनशीलता, सहकार्य, समजूतदारपणा, समर्पण, हास्य व आरोग्य.

ज्या घरात आज आजी आजोबा भांडतात, उद्या त्याच घरात नातवंडे मोठे होऊन आई वडिलांशी भांडतील. मुले अनुकरण करतात, उपदेश नाही. आठवणी गोड असाव्यात की कडू हे आजच्या वागण्यावर ठरते. पेन्शन बँकेत जमा होते. पण प्रेम हृदयात जमा करावे लागते.

वृद्धापकाळ हा शाप नाही तो सुवर्ण संधी आहे. एकमेकांना नव्याने जाणून घेण्याची, अर्धवट राहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याची. हिशेबाच्या वह्या बंद करा आणि आयुष्याचे नवीन पान सुरु करा.

साठी नंतरचे आयुष्य 'उरले ' नसते ते 'उरले - सुरलेले सोनेरी ' असते. अव्वल कारकून सारखी.... हजारो जोडपी आज,'कोण आधी मरेल 'या स्पर्धेत आहेत.*थांबा ! तुम्ही दोघेही जिंका.* कसे ?



वसंत पोतदार, सोलापूर
से. नि. ना. तहसीलदार.
मोबाईल ९४२३०६५९५

# लातूर जिल्ह्यात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (एसआयआर) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून या मोहिमेंतर्गत लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

**बीएलओच्या प्रत्यक्ष घरांना भेटी**

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या तपशिलाची खातरजमा २ हजार १४२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (बीएलए) त्यांना सहकार्य करणार आहेत.

**जनगणनेच्या कामाशी सांगड**

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

**लातूर जिल्ह्यासाठी महत्त्वाचे वेळापत्रक**

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

**राजकीय पक्षांना आवाहन**

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (बीएलए) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

**लातूर जिल्ह्यातील**
**विधानसभा क्षेत्रनिहाय मतदार संख्या**

- लातूर ग्रामीण– ३३२०११
- लातूर शहर– ३९९१०५
- अहमदपूर– ३४५३६०
- उदगीर (अ.जा.)– ३२३५६५
- निलंगा– ३३३३९१
- औसा– ३०३२०९

# आणि सावल्या झाल्या गायब ! नागरीकांनी अनुभवला दुर्मिळ खगोलीय चमत्कार



सावलीशिवाय दिसणारी छायाचित्रे मोठ्या प्रमाणावर व्हायरल सुनयना सोनवणे /पुणे: पुणे शहरातील नागरिकांनी बुधवारी (दि. १३) 'शून्यसावली दिवस' या दुर्मीळ खगोलीय घटनेचा रोमांचक अनुभव घेतला. दुपारच्या सुमारास काही मिनिटांसाठी सूर्य डोक्यावर अगदी लंबवत (डलळशपलश) आल्याने उभ्या वस्तूंच्या सावल्या अक्षरशः गायब झाल्या. उन्हाचा प्रखर तडाखा असूनही जमिनीवर सावली दिसत नसल्याने अनेकांनी हा अनोखा क्षण मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला.खगोलशास्त्रानुसार, सूर्य जेव्हा आकाशात सर्वाधिक उंचीवर पोहोचतो आणि त्याची किरणे पृथ्वीवर ९० अंशांच्या कोनात पडतात, तेव्हा 'शून्य सावली दिवस'अनुभवास येतो. या वेळी सूर्य नेमका डोक्यावर असल्याने व्यक्ती किंवा वस्तूची सावली तिच्याच खाली लपते आणि काही क्षणांसाठी ती दिसेनाशी होते. पुण्याचा अक्षांश सुमारे १८.५ अंश उत्तर असल्याने बुधवारी सूर्य याच स्थितीत पोहोचला होता.

शहरातील विविध भागांमध्ये नागरिकांनी रस्ते, मैदानं, गच्च्या आणि उद्यानांमध्ये उभे राहून या घटनेचा अनुभव घेतला. सोशल मीडियावरही खांब, बाटल्या आणि इतर वस्तू सावलीशिवाय दिसणारी छायाचित्रे मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली. आयुका तसेच विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. पाइप, सिलिंडर आणि उभ्या वस्तूंच्या साहाय्याने सावली कशी नाहीशी होते, हे विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले.

वैज्ञानिकांच्या मते, ही घटना पृथ्वीचा झुकाव, सूर्याभोवतीची परिक्रमा आणि खगोलीय गणित समजून घेण्यासाठी महत्त्वाची मानली जाते. विज्ञानप्रेमींसह सर्वसामान्य नागरिकांसाठीही हा दिवस विशेष आकर्षणाचा ठरला.

मुंग्यांच्या वारुळांचे अदृश्य होत चाललेले जग; पर्यावरणातील असमतोलाचा गंभीर इशारा

वैज्ञानिकांच्या मते, ही घटना पृथ्वीचा झुकाव, सूर्याभोवतीची परिक्रमा आणि खगोलीय गणित समजून घेण्यासाठी महत्त्वाची मानली जाते. विज्ञानप्रेमींसह सर्वसामान्य नागरिकांसाठीही हा दिवस विशेष आकर्षणाचा ठरला. खुल्या मैदानांमध्ये पाइप, सिलिंडर आणि इतर वस्तू ठेवून सावली गायब होण्याचा क्षण कॅमेऱ्यात कैद करण्यात आला. वैज्ञानिकांच्या मते, या घटनेचा उपयोग पृथ्वीचा व्यास आणि आकार समजून घेण्यासाठीही केला जातो.

'दररोज दुपारी सावली मोठी किंवा छोटी दिसते; मात्र आज काही क्षणांसाठी ती पूर्णपणे गायब झाल्यासारखी वाटली. पायाखालीच सावली लपल्याचा अनुभव खूप वेगळा होता.'

-विजय कांबळे, विद्यार्थी

# घरीच बनवा मसालेदार आणि चटकदार लोणचं



## लिंबाच्या सालीला फेकू नका

अनेकदा लिंबाची साल वापरल्यानंतर फेकून दिली जाते. तुम्हीही ही चूक करत असाल तर थांबा, यापासून तयार करा एक लज्जतदार आणु तोंडाला पाणी आणणारे चटकदार लोणचे. अनेक प्रकारची लोणची तुम्ही खाल्ली असतील.पण लिंबाच्या सालीपासून कधी लोणचं तयार केलं आहे का? हे लोणच चवीला फार छान लागतं. बहुतेक लोक लिंबाचा रस काढल्यानंतर त्याची साले निरुपयोगी समजून थेट फेकून देतात. मात्र, हीच लिंबाची साले अनेक चविष्ट पदार्थांसाठी उपयोगी ठरू शकतात, हे अनेकांना माहीत नसते. विशेषतः भारतीय स्वयंपाकात लिंबाच्या सालांचे लोणचे खूप लोकप्रिय मानले जाते. तुम्ही आजवर अनेक प्रकारच्या लोणच्यांचा आस्वाद घेतला असेल पण अद्याप लिंबाच्या सालीचं हे लोणचं जर तुम्ही चाखलं नसेल तर ही रेसिपी तुम्ही आजच घरी ट्राय करायला हवी.या लोणच्याची आंबट-तिखट चव साध्या जेवणालाही खास बनवते. याशिवाय लिंबाच्या सालांमध्ये नैसर्गिक तेल, अँटीऑक्सिडंट्स आणि काही पोषक घटक आढळतात, जे आरोग्यासाठीही फायदेशीर मानले जातात. घरच्या घरी अगदी कमी साहित्यामध्ये हे लोणचे सहज तयार करता येते. चला लिंबाच्या सालींपासून लोणच कसं तयार करायचं याची रेसिपी जाणून घेऊया. सकाळच्या नाश्त्याला बनवा खमंग आणि हेल्दी असा मूगडाळीचा पराठा, एकदा चाखाल तर पुन्हा बनवाल

**साहित्य**-२ कप लिंबाची साले
२ मोठे चमचे मीठ
१ मोठा चमचा लाल तिखट
१ छोटा चमचा हळद
१ मोठा चमचा जाडसर भरडलेली मोहरी
१ छोटा चमचा मेथीदाणे
४ ते ५ मोठे चमचे मोहरीचे तेल
चिमूटभर हिंग

# भगवतगीतेत जीवनाचा प्रवाह

भगवद्गीतेत जीवनाचे सत्य दडले असून जीवनात येणाऱ्या अडचणींचे कारण व निवारण दोन्ही गोष्टी सविस्तरपणे सांगण्यात आल्या आहेत म्हणून गीतेचा उपदेश जगभरात प्रसिद्ध आहे व प्रत्येक वर्गास प्रभावित करतो. गीता डॉक्टरप्रमाणे आहे. फरक इतकाच आहे की, डॉक्टर शारिरीक रोगांवर उपचार करतो व गीता मनातील रोग दुर करण्याचा मार्ग दाखवते. ज्याप्रकारे डॉक्टर रोगीचे रोग निवारण करण्यासह त्याचे कारण सांगतो, त्याप्रकारे जर गीतेचा सखोल अध्ययन केले तर मनातील रोगांचे कारण व निवारण दोन्ही समजतात. गीता मनाचे रोग दुर करण्याचे सशक्त माध्यम आहे. गीता ज्ञानामुळे मानवी जीवनातून मोह सहज दुर केला जाऊ शकतो. जीवनात दुःखाचे सर्वात मोठे कारण मोहच आहे. जर जीवनाला यशस्वी बनवायचे असेल व मोहातून मुक्त व्हायचे असेल तर गीतेच्या शरणात जावे लागेल. गीतेतून ज्ञान मिळवून मानव मोक्ष मिळवू शकतो. गीतेचे ज्ञान मानवाला त्याची आत्मा अमर होण्याच्या विषयात बोध करुन आपले कर्तव्य कर्म पूर्ण निष्ठेने करण्यास प्रेरित करतो. ईश्वराने मानवी देह फक्त भोगासाठी प्रदान केला नसून याचा उपयोग मोक्ष प्राप्तीसाठी केला पाहिजे. यासाठी आपण भजन, सत्संग, समाजसेवा व लोककल्याणाचे कार्य केले पाहिजे.साधु व नदी कधीच एका ठिकाणी थांबत नाही व सतत पुढे जात विविध ठिकाणी लोकांच्या हृदयात आपले ज्ञान व भक्तीच्या प्रभावाने त्यांना आनंदित करतो. प्रत्येक मानवास पुर्ण श्रद्धा व निष्ठेने उपकारासाठी तयार राहिले पाहिजे. आपल्या ज्ञानाने जग प्रकाशित करण्याचा प्रयत्न करत राहिले पाहिजे, वास्तवात हाच मानव धर्म आहे.

# 'घर असावे घरासारखे' आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन; जाणून घ्या नात्यांची वीण कशी जपायची?

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन दरवर्षी १५ मे रोजी साजरा केला जातो. कुटुंबांचे महत्त्व अधोरेखित करणे आणि त्यांच्यातील नातेसंबंध दृढ करण्यास प्रोत्साहन देणे, हा या दिवसाचा उद्देश आहे.

डॄ हर्षदा पाटोळे

१५ मे, म्हणजेच 'आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन' (खप-ींशीपरींळेपरश्र ऋराळश्र्र ऊ). रक्ताची नाती जेव्हा प्रेमाच्या धाग्याने एकत्र गुंफली जातात, तेव्हा त्याला 'कुटुंब' म्हणतात. कुटुंब ही आपल्या आयुष्यातील केवळ एक संस्था नसून, ती आपली पहिली शाळा आहे. जिथे आपण जगायचे कसे, प्रेम कसे करायचे आणि संकटात एकमेकांना आधार कसा द्यायचा, हे शिकतो. आजच्या तांत्रिक युगात आणि करिअरच्या स्पर्धेत आपण आपल्या माणसांपासून दूर जात असताना, हा दिवस आपल्याला आपल्या मुळांकडे परत जाण्याची आठवण करून देतो.

कुटुंब: संस्कारांची आणि मूल्यांची खाण

आपण कितीही मोठे झालो, तरी संकटाच्या वेळी सर्वात आधी आठवते ते आपले घर आणि आपले कुटुंब. आईचे प्रेम, वडिलांचे मार्गदर्शन, भावंडांची भांडणे आणि आजी-आजोबांच्या गोष्टी हे सर्व घटक मिळून एक व्यक्ती म्हणून आपले व्यक्तिमत्व घडवत असतात. संस्कारांची शिदोरी ही बाजारात विकत मिळत नाही, ती केवळ कुटुंबातच मिळते. एकमेकांचा आदर करणे, सहकार्याची भावना ठेवणे आणि निस्वार्थ प्रेम करणे हे गुण आपल्याला केवळ कुटुंबच शिकवू शकते.

आधुनिक काळातील आव्हाने आणि दुरावलेली नाती

विसाव्या आणि एकविसाव्या शतकात तंत्रज्ञानाने मोठी प्रगती केली. स्मार्टफोनमुळे आपण जगाच्या कोपऱ्यात असलेल्या लोकांशी जोडले गेलो, पण त्याच वेळी एकाच सोफ्यावर बसूनही घरातील माणसांशी मात्र आपण दुरावत गेलो. 'डिजिटल गॅप'मुळे संवादाची जागा चॅटिंगने घेतली आहे. कामाचा वाढता ताण आणि शहरांमधील धाव-पळीची जीवनशैली यामुळे कुटुंबाला वेळ देणे कठीण झाले आहे. अशा वेळी, हा आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन आपल्याला थांबायला शिकवतो. आजच्या दिवशी आपल्या कुटुंबासोबत किमान एक तास तरी गॅजेट्स



बाजूला ठेवून संवाद साधणे गरजेचे आहे.

सरकारी आणि सामाजिक उपक्रम

कुटुंब हे समाजाचे सर्वात लहान पण सर्वात महत्त्वाचे एकक (णपळीं) आहे. जर कुटुंब सुखी असेल, तरच राष्ट्र प्रगत होऊ शकते. याच भावनेतून दरवर्षी सरकार आणि विविध स्वयंसेवी संस्था या दिवशी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करतात. चर्चासत्रे, कौटुंबिक मूल्यांवर आधारित कार्यशाळा आणि जनजागृती मोहिमा याद्वारे कुटुंबाचे महत्त्व अधोरेखित केले जाते. केवळ आर्थिक सुबत्ता म्हणजे प्रगती नव्हे, तर कौटुंबिक स्थैर्य ही खरी प्रगती आहे, हे या दिनाचे ब्रीदवाक्य आहे.

जागतिक घडामोडी संबंधित बातम्या वाचण्यासाठी येथे क्लिक करा : क्शपश्रशू झर्रीीी खपवशु: जगातील सर्वशक्तिशाली पासपोर्टची यादी जाहीर; पाकिस्तानची पुन्हा चेष्टा, भारताच्या क्रमवारीत मोठा फेरबदल

या दिवशी काय करावे?

१. डिजिटल डिटॉक्स: आजच्या दिवशी मोबाईल आणि लॅपटॉप बाजूला ठेवून आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवा.

२. एकत्र जेवण: कुटुंबातील सर्व सदस्यांनी एकत्र बसून जेवण करा, जुन्या आठवणींना उजाळा द्या.

३. आदर आणि कृतज्ञता: आपल्या आई-वडिलांचे आणि वडीलधाऱ्यांचे आभार माना. त्यांच्यामुळेच आज तुम्ही जे काही आहात, ते शक्य झाले आहे.

४. मुलांशी संवाद: आपल्या घरातील लहानांशी गप्पा मारा, त्यांच्या समस्या समजून घ्या आणि त्यांना प्रेमाची उब द्या.

लक्षात ठेवा, यश मिळवण्यासाठी आयुष्य पडले आहे, पण ही नाती एकदा तुटली की पुन्हा जुळवणे कठीण असते. त्यामुळे, चला आज या आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनानिमित्त शपथ घेऊया की आपल्या कुटुंबाला आपण नेहमीच प्राधान्य देऊ!

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन कधी साजरा केला जातो?

आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन दरवर्षी १५ मे रोजी जगभरात साजरा केला जातो.

या दिवसाचा मुख्य उद्देश काय आहे?

कुटुंबांचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्यातील नातेसंबंध दृढ करणे आणि कौटुंबिक समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

हा दिवस साजरा करण्याची सुरुवात कधी झाली?

१९९३ मध्ये हा दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला आणि १९९४ पासून याची अधिकृत सुरुवात झाली.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



कोणत्याही रिलेशनमध्ये शारीरिक संबंधासाठी पुढाकार पुरुष अधिक करतात. हे प्रमाण तीनपट अधिक असल्याचे एका शोधात कळू आले आहे. शोधकर्त्यांनी सांगितले की लॉग टर्म रिलेशनशिपमध्ये जोडप्यांमध्ये इंटिमेट होण्याचे किती महत्त्व आहे. हैराण करणारे आकडे म्हणजे खूप काळापासून सोबत असलेल्या कपल्सवर करण्यात आलेल्या सर्व्हेमध्ये ते एकमेकांपासून **(क्रमश)**

## २ Joke विनोद




एक मुलगा देवाला प्रार्थना करीत असतो, ङ्गदेवा मला खूप मोठा कर. नाही जमलं तरी प्रयत्न कर. कारण प्रत्येकजण मला सांगत असतो की ङ्गप्रयत्नांती परमेश्वरफ कधी तरी तुला यश येईल.

## ३ Message संदेश



Pucha mujhse chand sitaro
ne, uje bhula diya kya tere
jigari yaro ne,
maine kaha, bhul to nhi skte,
bas lage honge kamine kisi
ko patane me.

## ४ Thought सुविचार




चंद्र आणि चंदनापेक्षा सज्जनांचा सहवास शीतल असतो. **अज्ञात**

**संस्कृत सुभाषित**

**स्वभावो नोपदेशने शक्यते कर्तुमन्यथा।**
**सुतप्तमपि पानीयं पुनर्गच्छति शीतताम।।**

अर्थ : उपदेश केल्याने माणसाच्या स्वभावात होणारे परिवर्तन हे तेवढ्यापुरतेच असते, ते टिकत नाही. खूप तापवलेले पाणी पुन्हा थंड होत असते.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रमेश देवबरोबरच्या या सिनेमात सीमा खलनायिका होती
६. ऐनवेळी कच खाणारा
११. न्याय
१२. सोशिकपणा
१४. नवरा
१५. अरण्य
१६. लोटी
१८. उगवत्या सूर्याचा देश
२१. च्या पुढे, समक्ष
२३. वेळेचा कमीत कमी भाग
२४. विरोध, प्रतिबंध
२७. पत, प्रतिष्ठा
२८. शंकराजवळचे चर्मवाद्य
२९. टप्प्याने टप्प्याने केलेला प्रवास
३२. अवधान, लक्ष
३३. भडक
३६. पळून जाणे
३९. कलावंत
४१. मत नोंदवण्याचा कालबाह्य कागद
४४. सोसाट्याचा वारा
४५. पवित्र
४६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना
४९. परिस्थिती, कालाचे परिमाण
५२. सामान
५३. बस्तान
५४. मज्जाव
५६. आश्रय, थारा
५८. प्रकाश निर्माण करणारा सूर्य
६०. वाहणारी हवा
६१. जन्मदाते
६३. पाणी
६५. दक्ष
६६. यजमान
६७. आरोप, बालंट
६८. प्रयाण
६९. लोकमानस
७१. इच्छा, आकांक्षा (हिंदी)
७३. आपल्या उत्तर सीमेवरील एक राष्ट्र
७५. किंचित ओलावलेले (डोळे) (हिंदी)
७६. कामाचा उरका
७८. शिव
८०. अवाजवी
८२. भाजपा नेते 'नितीन ----'
८४. संथ
८५. स्तुतीची गाणी
८६. दुःखी होणे, वेदनेने ओरडणे

### उभे शब्द

१. लकब
२. खिशाला चाट
३. धास्ती, भीती
४. आपले राष्ट्रगीत
५. आलटापालट
७. खून
८. शिकारीसाठी हेरलेला प्राणी
९. डोसा
१०. शरीर, काया
१३. गलबताचे कापड
१७. भाकरी व इतर पदार्थांचा कुस्करा, दूधभाकरी
१९. वैमानिक (इंग्रजी)
२०. अंकुर
२२. रम्य, मनोहर
२५. दात
२६. अंधार
२७. फोडणीचे वरण
३०. प्रचंड
३१. जपजाप्य
३४. बगळा
३५. थेळ, सरळ
३७. लोकरीचा एक प्रकार
३८. लग्नकार्याचे लेखी आमंत्रण
४०. लबाडीचा हेतू
४२. सर्वस्वाने
४३. यापेक्षा 'आज' महत्त्वाचा
४५. पालनपोषण करणारा
४७. शोभणारा
४८. मृत्यूदेवता
५०. जयश्री गडकरचा चंद्रकांत गोखले यांच्या बरोबरचा गाजलेला चित्रपट
५१. नूतन
५२. तंबाखूचा असल्यास घातक
५५. मानबिंदू (ला.)
५७. कमळ
५८. दिवस
५९. कणीदार
६०. संसारातून अंग काढून घेणे
६१. सुखाच्या मोजमापाचे धान्य
६२. दाह, मत्सर
६४. मिरवणूक
६५. पत्राचा कालबाह्य झालेला मायना
६६. नम्रतेने मान खाली घालणे
६७अ. आल्या पावली, लगेच
७०. 'राही --- दुख की चिंता क्यों सताती है' (दोस्ती)
७२. थकवा
७४. सांभाळ
७७. खाली खेचणे, पराभूत करणे
७८. अधिकाराचे स्थान
७९. त्रासलेला
८०. शर्त
८२. माराची उठलेली खूण
८३. अस्वल

### आडवे उत्तरे

१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अव-ास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

### उभे उत्तरे

१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सा न वि वि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस




## थोडक्यात/ संक्षिप्त

### अंबानी करणार जगातील सर्वात मोठ्या डिजिटल साम्राज्याचे नेतृत्व

मुंबई –रिलायन्स समूहाच्या मजिओ प्लॅटफॉर्म्सफ या कंपनीने आपल्या मआयपीओफ प्रक्रियेपूर्वीच, आकाश अंबानी यांची कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती केली आहे. कंपनीने सेबीकडे दाखल केलेल्या कागदपत्रांमधून ही माहिती समोर आली आहे.जिओ प्लॅटफॉर्म्स आपल्या आयपीओ संदर्भातील कागदपत्रे मे महिन्याच्या अखेरीस किंवा जूनमध्ये सादर करेल, अशी अपेक्षा आहे. आकाश एम. अंबानी यांची ९ एप्रिल २०२६ पासून लागू होणाऱ्या ५ वर्षांच्या कालावधीसाठी कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, त्यांच्या कार्यकाळात, जिओने २०१६ मध्ये लाँच झाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांच्या आतच १० कोटी ग्राहकांचा टप्पा ओलांडण्याची कामगिरी केली होती.


### चेन्नईच्या दुखापतींचे सत्र थांबेना! प्लेऑफ सुरु होण्याआधी प्रमुख खेळाडू घरी परतला, कारण

मुंबई –आयपीएल २०२६ स्पर्धा सध्या निर्णायक टप्प्यावर आहे. लवकरच प्लेऑफमध्ये जाणारे ४ संघ कोण? हे चित्र स्पष्ट होणार आहे. चेन्नई सुपर किंग्स संघाकडेही प्लेऑफमध्ये जाण्याची संधी असणार आहे. त्यासाठी चेन्नईला इथून पुढील सामन्यांमध्ये विजय मिळवणे गरजेचे असणार आहे. त्याआधी चेन्नई सुपर किंग्स संघाला मोठा धक्का बसला आहे.आयपीएल २०२६ स्पर्धा संपत आली, पण चेन्नई सुपर किंग्स संघाचे दुखापतीचे सत्र काही थांबायचं नाव घेत नाहीये. स्पर्धेच्या सुरुवातीलाच एमएस धोनी दुखापतग्रस्त झाला होता, तो अजूनही पूर्णपणे फिट होऊ शकलेला नाही. त्यानंतर स्टार फलंदाज आयुष म्हात्रे दुखापतग्रस्त होऊन, संपूर्ण स्पर्धेतून बाहेर पडला.

### ज्या खेळाडूवर पाकिस्तानला गर्व, त्याला ९ वर्षांच्या मुलाने केले क्लीन बोल्ड

नवी दिल्ली–क्रिकेटच्या मैदानात कधी काय घडेल याचा नेम नाही. सध्या पाकिस्तान क्रिकेट संघाचा महत्त्वाचा खेळाडू आणि भविष्य मानला जाणारा फलंदाज सईम अयुब एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला.२३ वर्षांच्या या आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटूला एका अवघ्या ९ वर्षांच्या मुलाने प्रॅक्टिस दरम्यान चकीत करत क्लीन बोल्ड केलं. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल होत आहे.प्रॅक्टिस दरम्यान नेमकं काय घडलं?सोशल मीडियावर समोर आलेल्या या व्हिडिओमध्ये सईम अयुब नेट प्रॅक्टिस करताना दिसत आहे. समोरून एका ९ वर्षांच्या चिमुकल्याने टाकलेला चेंडू अयुबने बचावात्मक खेळण्याचा प्रयत्न केला. मात्र, चेंडूने बॅटला हुलकावणी दिली आणि थेट स्टंपचा वेध घेतला. स्वत: आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणारा खेळाडू अशा रितीने बाद झाल्याचे पाहून नेटकरी आश्चर्य व्यक्त करत आहेत.

### सिंधू, श्रीकांत आणि लक्ष्य सेन यांचे विजय



बँकॉक : भारताचे नामांकित बॅडमिंटनपटू सिंधू, श्रीकांत आणि लक्ष्य सेन यांनी महिला आणि पुरुष एकेरीच्या दुसर्या फेरीत चांगली कामगिरी केली. तसेच आगामी फेरी गाठली. सिंधूने चीनच्या थु ची थांग हिला २१–९ २१–१२ असे नमविले. तर लक्ष सेन याने सिंगापूरच्या जी हेंग जेसन याला २१–१६, २१–१७ असे पराभूत केले. तर श्रीकांत याने देखील सिंगापूरच्या लो केन यो याचा २१–१४, २१–१५ असा पराभव केला. त्याआधी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी जबरदस्त कामगिरी केली होती.

# मुंबई इंडियन्सचा थरार! वर्माचा विजयी 'तिलक'



पंजाबच्या गोलंदाजांना पॉवर प्लेमध्ये मुंबईच्या सलामीवीरांना आउट करता आले नाही त्यानंतर अझमतुल्ला उमरझाईने रियान रिकल्टनची विकेट घेतली. तर मार्को जानसेनने मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नांमध्ये असणाऱ्या नमन धीरला आउट केले.
डू तेजस भागवत
णविरींशव जपः चरू १४, २०२६ । ११:२९ झच्
खझङ २०२६ चा थरार! वर्माचा विजयी 'तिलक; पलटणकडून झइघड चा पंचनामा, किंग्जचे टेंशन वाढले
झइघड ती चख ड्ळींश डीशरा–ळपस (फोटो– ट्विटर)
आज धरमशाळा येथील जगप्रसिद्ध क्रिकेट स्टेडियमवर मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्जमध्ये सामना झाला. हा सामना पंजाब किंग्जसाठी महत्वाचा होता. पंजाबने (खझङ २०२६) प्रभसिमरन सिंगच्या खेळींच्या जोरावर मुंबई इंडियन्सला २०१ रन्सचे टार्गेट दिले होते. तिलक वर्माने शानदार खेळी केली. अखेर या सामन्यात मुंबई इंडियन्सने पंजाब किंग्जचा ६ विकेट्सने पराभव केला.मुंबई इंडियन्सची फलंदाजी

## किंग्जचे टेंशन वाढले

पंजाबने दिलेल्या २०१ रन्सचे टार्गेट पूर्ण करण्यासाठी मुंबई इंडियन्सकडून रियान रिकल्टनने आणि रोहित शर्माने सुरुवात केली. या दोघा सलामीवीरांनी मुंबईला अत्यंत मजबूत अशी सुरुवात करून दिली. मात्र रियान रिकल्टनने ४८ रन्सची शानदार खेळी केली. नमन धीरने ८ रन्सची लहानशी खेळी केली. रोहित शर्माने २५ रन्सची खेळी केली. मुंबई इंडियन्सचा विजय अवघड झाला असताना तिलक वर्माने डाव सांभाळला. त्याने संयमी खेळी करत अर्धशतक लगावले. तिलक वर्माने ३३ बॉलमध्ये ७५ रन्सची खेळी केली.
पंजाब किंग्जची गोलंदाजी
पंजाबच्या गोलंदाजांना पॉवर प्लेमध्ये मुंबईच्या सलामीवीरांना आउट करता आले नाही त्यानंतर अझमतुल्ला उमरझाईने रियान रिकल्टनची विकेट घेतली. तर मार्को जानसेनने मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नांमध्ये असणाऱ्या नमन धीरला आउट केले. युझवेंद्र चहलने रोहित शर्माला आउट केले.
पंजाब किंग्जची फलंदाजी
मुंबई इंडियन्सने पंजाबला प्रथम फलंदाजी करण्यासाठी आमंत्रित केले होते. पंजाब किंग्जकडून प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्य यांनी सुरूवात केली. प्रियांश आर्यने चांगली सुरुवात केली. मात्र तो २२ रन्स करून आउट झाला. त्यानंतर प्रभसिमरन सिंग आणि कूपर कॉनली यांनी पंजाबचा डाव सांभाळला. प्रभसिमरन सिंग ५७ रन्सची अर्धशतकी खेळी करून आउट झाला. कूपर कॉनली २१ रन्स करून आउट झाला. कर्णधार श्रेयस अय्यर आज चांगली खेळी करू शकली नाही. श्रेयस अय्यरने ४ रन्स केल्या. सुयश शेडगेने ८ रन्सची खेळी केली. शशांक सिंगने तर जानसनने २ रन्स केल्या. तर ओमरझाईने महत्वाच्या ३८ रन्सची खेळी केली.मुंबई इंडियन्सची गोलंदाजी
मुंबई इंडियन्सचे नेतृत्व आज जसप्रीत बुमराह करत आहे. मुंबईने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पंजाबच्या सलामीच्या जोडीला रोखण्याचे मुख्य आव्हान मुंबईसमोर होते. नमन धीरने ५ रन्सवर असताना प्रभसिमरनचा कॅच सोडला. मात्र दीपक चाहरने २२ रन्सवर खेळणाऱ्या प्रियांश आर्यला आउट केले. शार्दुल ठाकूरने ४ महत्वाच्या विकेट्स घेतल्या आ–हेत. राज बावाने देखील १ विकेट घेतली.
पंजाब किंग्स : श्रेयस अय्यर (कर्णधार),प्रियांश आर्य , हरनूर सिंग, प्रभसिमरन सिंग, मिचेल ओवेन, नेहल वढेरा, अजमतुल्लाह उमरजई, मार्को यानसन ,मुशीर खान. शशांक सिंग, मार्कस स्टोइनिस, सूर्यांश शेडगे,अर्शदीप सिंग, जेवियर बार्टलेट, युजवेंद्र चहल, लॉकी फर्ग्यूसन, हरप्रीत बराड़, विजयकुमार विशाक, यश ठाकुर, कूपर कोनोली, बेन ड्वार्शियस, पाइला अविनाश, विष्णू विनोद, प्रवीण दुबे, विशाल निषाद. पलटण सूड घेणार की 'किंग्ज' मैदान मारणार? पहा धर्मशाळाचा पीच रिपोर्ट
मुंबई इंडियन्स: हार्दिक पंड्या (कर्णधार), रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, नमन धीर, शेरफेन रदरफोर्ड, रयान रिकेल्टन, विल जॅक, कॉर्बिन बॉश, तिलक वर्मा, ट्रेंट बोल्ट, अश्विनी कुमार, जसप्रीत बुमराह, दीपक चाहर, मयंक मारकंडे, शार्दुल ठाकूर, क्विंटन डीकॉक, दानिश मालेवार, ए. एम. गझनफर, मयंक रावत, रघु शर्मा, मोहम्मद सलाउद्दीन इझहार.

### खुनाच्या केसमधून नाव वगळण्यासाठी मागितले १ कोटी रुपये: क्रिकेटर

दिल्ली–बांगलादेशचा दिग्गज ऑलराऊंडर शाकिब अल हसनने एक मोठा खुलासा केला आहे. शाकिब अल हसनने बांगलादेशमधील प्रसिद्ध वर्तमानपत्र प्रथम अलो याला मुलाखती देताना खुलासा केला की त्याच्यावर लागलेले खुनाचे आरोप मागे घेण्यासाठी बांग्लादेशच्या चलनातील १ कोटी रुपये मागण्यात आले होते. शाकिब अल हसन विरुद्ध बांगलादेशात ऑगस्ट २०२४ मध्ये हत्येचा गुन्ह्यात नाव गोवण्यात आले होते. त्या केसमधून नाव वगळण्यासाठी शाकिबकडून एक कोटी रुपये घेण्यात आले होते.

## विराट १४००० धावा करणारा पहिलाच भारतीय



रायपूर–आयपीएल २०२६ च्या मागील दोन सामन्यांमध्ये ज्याची बॅट शांत होती, त्या विराट कोहलीनं कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात शतकी खेळी केली. या सामन्यात कोहलीनं टी–२० क्रिकेटमध्ये असा पराक्रम केला, जो यापूर्वी कोणत्याही भारतीय खेळाडूने केला नव्हता. कोलकाता नाईट रायडर्सविरुद्धच्या सामन्यात सर्वांच्या नजरा कोहलीवर होत्या आणि जेव्हा त्यानं आपलं खातं उघडलं, तेव्हा जल्लोष साजरा करण्यात आला. यानंतर, जेव्हा विराट कोहलीनं आपल्या डावातील ७८ धावा पूर्ण केल्या, तेव्हा तो टी–२० क्रिकेटमध्ये १४,००० धावांचा टप्पा गाठणारा केवळ सहावा खेळाडू आणि पहिला भारतीय ठरला.
ख्रिस गेलचा विक्रम मोडला : विराट कोहलीची गणना जागतिक क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमधील महान खेळाडूंमध्ये केली जाते. तो असा खेळाडू आहे ज्यानं टी–२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावांमध्ये १४,००० धावांचा टप्पा गाठला आहे, त्यानं केवळ ४०९ डावांमध्ये हा टप्पा गाठला आहे. हा विक्रम यापूर्वी ख्रिस गेलच्या नावावर होता, ज्यानं टी–२० क्रिकेटमध्ये ४२३ डावांत १४,००० धावा पूर्ण केल्या होत्या. या फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा भारतीयांचा विक्रम कोहलीच्या नावावर आहे, तर ४५६ डावांत १२,४९१ धावा करुन रोहित शर्मा या यादीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.
टी–२० क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावांमध्ये १४,००० धावा करणारे खेळाडू :
विराट कोहली (भारत) – ४०९ डाव
ख्रिस गेल (वेस्ट इंडिज) – ४२३ डाव
डेव्हिड वॉर्नर (ऑस्ट्रेलिया) – ४३१ डाव
जॉस बटलर (इंग्लंड) – ४६८ डाव
ॲलेक्स हेल्स (इंग्लंड) – ५०५ डाव
किरॉन पोलार्ड (वेस्ट इंडिज) – ६३३ डाव
शतक झळकावून डेव्हिड वॉर्नरची बरोबरी : विराट कोहलीनं केकेआरविरुद्धच्या सामन्यात शतक झळकावून टी–२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं करणाऱ्या डेव्हिड वॉर्नरच्या तिसऱ्या स्थानाची बरोबरी केली. हे कोहलीचं टी–२० क्रिकेटमधील १० वं शतक आहे. या यादीत ख्रिस गेल २२ शतकांसह अव्वल स्थानी आहे, तर बाबर आझम १३ शतकांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयपीएलमध्ये सर्वाधिक शतकं झळकावण्याच्या बाबतीत कोहली आधीच पहिल्या क्रमांकावर आहे, हे त्याचं नववं शतक आहे.
टी–२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतके करणारे खेळाडू: ख्रिस गेल (वेस्ट इंडिज) – २२ शतके
बाबर आझम (पाकिस्तान) – १३ शतके
विराट कोहली (भारत) – १० शतके
डेव्हिड वॉर्नर (ऑस्ट्रेलिया) – १० शतके.

## सीएसकेला मोठा धक्का ! स्टार खेळाडू दुखापतीमुळे हंगामातून बाहेर..

दिल्ली–ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वात सीएसकेने हंगामाची सुरुवात सलग तीन पराभवाने केली होती. मात्र संघाने हळूहळू लय पकडली आहे. सीएसकेने आतापर्यंत ११ पैकी सहा सामने जिंकले आहेत आणि १२ गुणांसह गुणतालिकेत पाचव्या स्थानावर आहेत. प्लेऑफला पात्र होण्यासाठी संघाला उर्वरित तीन सामन्यांपैकी दोन सामने जिंकावे लागतील. या महत्त्वाच्या टप्प्यावर सीएसकेला मोठा धक्का बसला आहे. संघातील स्टार खेळाडू दुखापतीमुळे बाद झाला आहे. तो उर्वरित सामने खेळण्याची शक्यता मावळली आहे. फ्रँचायजीने बुधवारी (१३ मे) रात्री सोशल मीडियावरून जाहीर केले की, अष्टपैलू खेळाडू जेमी ओव्हरटन मांडीला दुखापत झाल्याने घरी रवाना झाला आहे. फ्रँचायझीने सांगितले की ओव्हरटन आयपीएल २०२६ च्या उर्वरित



सामन्यांमधून अधिकृतपणे वगळले आहे.
जेमी ओव्हरटनची कामगिरी–सीएसकेसाठी जेमी ओव्हरटन यंदाच्या हंगामात चांगली कामगिरी करत होता. लखनऊ विरुद्धच्या सामन्यात त्याने चार षटकांत ३६ धावा देत तीन विकेट्स घेतल्या होत्या. त्याच्या प्रयत्नांमुळे लखनऊला २०३ धावांवर रोखण्यात सीएसके यशस्वी झाली होती. धावांचा पाठलाग करताना सीएसकेने शेवटच्या षटकांत लक्ष्य पूर्ण केले. जेमी ओव्हरटनने यंदाच्या हंगामात सीएसकेसाठी १० सामन्यांमध्ये १७.७८ च्या सरासरीने गोलंदाजी करत १४ विकेट्स घेतल्या आहेत, तसेच १५२ च्या स्ट्राइक रेटने १३६ धावा केल्या आहेत.
सीएसकेची डोकेदुखी–सीएसकेचे अनेक खेळाडू दुखापतीमुळे यंदाच्या हंगामातून बाहेर झाले आहेत. यंदाच्या हंगामात सीएसकेसाठी ही सर्वात मोठी डोकेदुखी झाली आहे. नुकताच संघाने दुखापतग्रसत खेळाडू रामकृष्ण घोषच्या जागी कर्नाटकाच्या अष्टपैलू मॅकनील नोरोन्हा याला संघात सामील केले आहे. तसेच संघासाठी धोनीने अद्याप एकही सामना खेळलेला नाही. हंगामाच्या सुरुवातीलाच वेगवान गोलंदाज नॅथन एलिस हंगामातून बाहेर झाला होता, आणि आता उजव्या मांडीच्या दुखापतीमुळे ओव्हरटन बाहेर झाला आहे.

## फलंदाजाच्या गळ्यातून गायब झाली सोन्याची चैन, नेमकं काय घडले?

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये ५७ वा सामना हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात पार पडला. या सामन्यात आरसीबीने ६ विकेट्सने विजय मिळवला. त्यामुळे आरसीबीचा संघ आयपीएल २०२६ च्या पॉईंट्स टेबलमध्ये नंबर १ वर पोहोचला आहे, त्यांच्या खात्यात १६ पॉईंट्स झालेत. या सामन्यादरम्यान इंग्लंडचा एक फलंदाज जॅकब बेथेल हा गोल्डन चैन घालून केकेआर विरुद्ध सामन्यात खेळण्यासाठी उतरला, मात्र या दरम्यान त्याच्या गळ्यातील सोन्याची चैन जमिनीवर पडली आणि त्याला माहित सुद्धा पडलं नाही, ज्यामुळे त्याची ही चैन सामन्यात चर्चेचा विषय राहिली. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या चौथ्या ओव्हरच्या दुसऱ्या बॉलवर जॅकब बेथेल कार्तिक त्यागीच्या १४४ खश्झ्फ च्या वेगाने आलेल्या बाउंसरवर कॅच आउट झाला. कार्तिक त्यागीचा शॉर्ट पीच बॉल हा आधी जॅकब बेथेलच्या हातावर आणि मग हेल्मेटवर लागला. हेल्मेटवर बॉल लागल्याने जेव्हा झटका लागला तेव्हा गोल्डन चेन तुटली आणि गळ्यातून बाहेर पडली. जॅकब बेथेलने मारलेला बॉल हा कार्तिक त्यागीने कॅच केला आणि तो आउट होऊन डग आउटमध्ये परतला. आउट झाल्यावर तो मैदानाच्या बाहेर जात होता तेव्हा त्याला अजिबात समजलं नाही की त्याची गोल्डन चैन ही मैदानावर पडलीये. जॅकब बेथेल बाद झाल्यावर आरसीबीचा नवा फलंदाज देवदत्त पडिक्कल फलंदाजीसाठी मैदानात आला.

## भारताच्या लेकीने रचला इतिहास; डब्लयूडब्ल्यूई रिंगमध्ये भगव्या सलवार सूटमध्ये घातला धुमाकूळ

थथए थीशीींश्रशी घरींळींर ऊर्शीळ उीश–रींशव क्ळीींू: कविता देवीने थथए च्या रिंगमध्ये भगव्या सलवार सूटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत इतिहास रचला आहे. भारतात थथए चे लाखो फॅन्स आहेत. गेल्या काही वर्षांत, अनेक भारतीय कुस्तीपटूंनी थथए रिंगमध्ये आपले कौशल्य दाखवून दिले आहे. त्यापैकी एक म्हणजे भारताची पहिली महिला थथए रेसलर कविता देवी. कविता थथए रिंगमध्ये प्रवेश करणारी पहिली भारतीय महिला कुस्तीपटू आहे. कविताने देसी स्टाइलमध्ये सलवार सूट घालून अनेक दिग्गज कुस्तीपटूंना पराभूत केले आणि जागतिक स्तरावर आपल्या कौशल्याची छाप सोडली.
खझङ २०२६: प्लेऑफची शर्यत रंगली, ठउइ च्या विजयाने बदलले पॉईंट्स टेबलचे समीकरण; कोणते संघ करणार टॉप–४ मध्ये एन्ट्री
थथए च्या रिंगमध्ये कविताची देसी स्टाइलमध्ये एन्ट्री
कविताने थथए रिंगमध्ये प्रवेश करणारी पहिली भारतीय महिला रेसलर म्हणून इतिहास रचला आहे. तिने २०१७ मध्ये थथए मध्ये पदार्पण केले. तिने थथए च्या रिंगमध्ये भगव्या रंगाचा सलवार सूट परिधान करुन अनेक सामने खेळले आणि आपली भारतीय ओळख जागतिक स्तरावर अधोरेखित केली. कविताने आपल्या मेहनतीने असंख्य पदके जिंकली आणि आपल्या देशाला गौरव मिळवून दिला. २०१७ मध्ये, (चरश धींपस उश्रीीळल) ङ्गमे यंग क्लासिकफ्मध्ये सहभागी होऊन तिने जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण केली. (थीशींश्रश चरपळर ३४) रेसलमेनिया ३४ मधील कविताच्या दमदार कामगिरीने प्रेक्षक आणि अनेक कुस्तीपटूंना प्रभावित केले. तिची ताकद आणि आत्मविश्वास पाहून काही चाहत्यांनी तिला ङ्गलेडी खलीफ असे नावही दिले.
कोण आहे कविता देवी?
कविताचे पूर्ण नाव कविता दलाल असे आहे. तिला कविता देवी या नावानेही ओळखले जाते. कविताचा जन्म २० सप्टेंबर १९८७ रोजी हरियाणा राज्यात झाला. थथए मध्ये सामील होण्यापूर्वी, कविताने कुस्ती आणि वेटलिफ्टिंगमध्ये यश संपादन केले होते. तिची उंची अंदाजे ५ फूट ९ इंच आहे आणि वजन ७० किलोग्रॅमपेक्षा जास्त आहे. तिची तुलना अनेकदा ङ्गद ग्रेट खलीफ्शी केली जात असे. कविताने ङ्गद ग्रेट खलीफ्च्या ङ्गकॉन्टिनेन्टल रेसलिंग एंटरटेनमेंट अकादमीफ्मध्ये कुस्तीचे प्रशिक्षणही घेतले आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व केले. त्यानंतर, २००९ मध्ये ती लग्नबंधनात अडकली आणि एका वर्षानंतर आई झाली. आई झाल्यानंतर, तिने या खेळातून निवृत्त होण्याचा विचार केला, परंतु तिच्या पतीने तिला पाठिंबा दिला आणि तिची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

**डब्ल्यूडब्ल्यूई चा ऐतिहासिक प्रवास**

कविता २०१७ ते २०२१ पर्यंत थथए चा भाग होती. त्यानंतर थथए ने तिला रिलीज केले. कविताने २७ जुलै २०१९ रोजी थथए मध्ये आपला शेवटचा सामना खेळला. त्यानंतर ती खेळापासून दूर झाली.



# ‘एल-निनो’मुळे उद्भवणारी संभाव्य परिस्थिती लक्षात घेवून खरीप हंगामासाठी आवश्यक सज्जता ठेवावी-पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

## *जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक * बियाणे, खते वितरणात सुसूत्रता ठेवावी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार २०२६ च्या मान्सूनवर 'एल-निनो'चा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामात उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक सज्जता ठेवावी. तसेच शेतकऱ्यांना पेरणी, बियाणे व खत वापर याविषयी योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.

खरीप हंगाम पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह पशुसंवर्धन विभाग, अग्रणी बँक, आत्मा, वन आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते यांचा पुरवठा सुरळीत होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्वच कृषि निविष्ठा केंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात बियाणे, रासायनिक खते उपलब्ध करून द्यावीत. कोणत्याही तालुक्यात तुटवडा निर्माण होवू नये, यासाठी निविष्ठा वितरणात सुसूत्रता ठेवावी, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी दिल्या. तसेच महाबीज बियाणे वितरणाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

'एल-निनो'मुळे मॉन्सूनमध्ये अनिश्चितता राहणार असल्याने शेतकऱ्यांना पेरणी योग्य कालावधीबाबत सातत्याने मार्गदर्शन करावे, कोणत्या कालावधीत कोणत्या पिकाची पेरणी करणे योग्य राहील, याबाबत जनजागृती करावी. तसेच संभाव्य परिस्थितीत दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण



झाल्यास त्यासाठी पुरेसे बियाणे उपलब्ध होईल, यादृष्टीने सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते आणि पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन करावे. यासाठी कार्यशाळा, प्रशिक्षणाचे आयोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्री श्री. भोसले यांनी यावेळी दिल्या.

लातूर जिल्ह्यातील वृक्षांचे प्रमाण अतिशय कमी असल्याने जिल्ह्यात वृक्ष लागवडीवर भर देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना आहेत.



त्यानुसार आगामी काळात जास्तीत जास्त वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करावेत. यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. यासोबतच जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कदम यांनी खरीप हंगाम पूर्वतयारीबाबत माहिती दिली. आगामी खरीप हंगामात ४ लाख ८५ हजार ५६४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणीचे नियोजन असून त्यासाठी ३ लाख ६४ हजार २४८ क्विंटल बियाणे लागणार आहे. यापैकी २ लाख ३६ हजार ७६१ क्विंटल बियाणे शेतकऱ्यांकडे उपलब्ध असून महाबीज, राष्ट्रीय बीज निगम आणि खासगी कंपन्यांचे एकूण १ लाख २७ हजार ४८७ क्विंटल बियाणे उपलब्ध होणार आहे. रासायनिक खतांच्या सरासरी वापरानुसार यंदा १ लाख ४५ हजार मेट्रिक टन खताची आवश्यकता भासेल असा अंदाज आहे. त्यानुसार महिनानिहाय पुरेसे खतसाठा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. बोगस बियाणे, खत विक्री रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. 'एल-निनो' मुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत पीक नियोजनाबाबत कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार पर्यायी पीक पद्धती, योग्य वाण निवड, राखीव बियाणे साठा यासंदर्भात व्यापक जनजागृती करण्यात येत असल्याचे श्री. कदम यांनी सांगितले.

आमदार श्री. काळे, खासदार डॉ. काळगे, आमदार श्री. कराड यांनीही यावेळी अनुषंगिक सूचना दिल्या.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत १९ मे रोजी जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेचे आयोजन

## शासकीय योजनांची मिळणार सविस्तर माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे लातूर जिल्हा कार्यालय, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातंग समाजातील १२ पोटजातींमधील बांधवांसाठी १९ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातील शासकीय मुलांचे वसतिगृह अभ्यासिका हॉल होणार आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील मातंग समाजाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचावी आणि जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, या उद्देशाने या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत समाज कल्याण विभाग आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध वैयक्तिक आणि सामूहिक लाभ योजनांची सविस्तर माहिती दिली जाईल. तसेच महामंडळामार्फत मिळणारे कर्ज, शैक्षणिक सवलती आणि रोजगाराच्या संधींबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मातंग समाजातील युवक-युवती आणि गरजू लाभार्थ्यांनी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांची माहिती घ्यावी, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

# सोन्याच्या दागिण्याची चोरी : गुन्हा दाखल

**शिराढोण/प्रतिनिधी:** पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी श्रीकृष्ण भारत गोरे, वय ३२ वर्षे, रा. रांजणी ता. कळंब जि. धाराशिव यांचे राहते घरातील ४ तोळे सोन्याचे दागिने एकुण १,२०,००० किंमतीचा माल हा अज्ञात व्यक्तीने दि. ०२.०५.२०२६ रोज चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-श्रीकृष्ण गोरे यांनी दि.१३.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# आ. अमित देशमुख यांनी केले डॉ. अशोक आरदवाड कुटुंबियांचे सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी:** गुरुवार दि. १४ मे २०२६ लातूर येथील सुप्रसिद्ध बालरोगतज्ञ डॉ. अशोक आरदवाड यांच्या मातोश्री चंद्रकलाबाई गोविंदराव आरदवाड यांचे नुकतेच निधन झाले आहे. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील अंबाजोगाई रोडवरील मुक्ताई मंगल कार्यालयाजवळील सुप्रसिद्ध ज्येष्ठ बालरोगतज्ञ डॉ. अशोक आरदवाड यांच्या निवासस्थानी जाऊन चंद्रकलाबाई गोविंदराव आरदवाड यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण केली, भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. त्यांचे सुपुत्र डॉ. अशोक आरदवाड व आरदवाड कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, त्यांना धीर दिला. यावेळी लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंखे, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष एडवोकेट किरण जाधव, लातूर शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख,



डॉक्टर धर्मराज दुड्डे, डॉक्टर अजय जाधव, डॉक्टर डी.एन.चिंते, डॉक्टर कल्याण बरमदे, कल्याण पाटील बंडू किसवे, डॉक्टर मुकुंद भिसे, डॉक्टर संजय पौळ पाटील, व्यंकटेश पुरी, राजपाल माने, विष्णुदास धायगुडे आदिसह आरदवाड कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

# इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मिळणार शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके- श्री.दयानंद सुरवसे

**लातूर/प्रतिनिधी :** समग्र शिक्षा,जिल्हा परिषद,लातूर अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरित करणाऱ्या वाहनाच्या वाहनाला हिरवा झेंडा दाखवून वाहतुकीचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती,शिक्षण समिती,जिल्हा परिषद,लातूर मा. श्री दयानंद सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती तृप्ती अंधारे या उपस्थित होत्या.

सन २०२६-२७ या वर्षात जिल्ह्यातील मराठी माध्यमाच्या २,०४,९०३,सेमी माध्यमाच्या १८२ व उर्दू माध्यमाच्या २६,३३१ अशा एकूण २३१४१६ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक शाळेच्या पहिल्या दिवशी वितरित करण्यात येणार आहेत त्यासाठी बालभारती,विभागीय मंडळ, लातूर येथून सदर पुस्तके तालुकास्तरावर व तालुका स्तरावरून ते शाळा स्तरावर वितरित करण्याची नियोजित आहे.

पाठ्यपुस्तक तालुकानिहाय वाटप पुढीलप्रमाणे होणार आहे.लातूर-८१३०५, अहमदपूर- २६३०२, औसा- २७३६९, निलंगा- ३०७११,उदगीर- ३६८९५, चाकूर१६३७४,रेणपुर-१०१८०, देवणी-७६३५,जळकोट-८५१३ व शिरूर अ. -६१३२



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार यावर्षी इयत्ता दुसरी,तिसरी,चौथी व सहावी या वर्गाचा अभ्यासक्रम बदलल्यामुळे नवीन अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके हे विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत.

सदरील कार्यक्रमास बालभारती,विभागीय मंडळाचे श्री.सचिन आलडवाड,भांडार व्यवस्थापक लातूर,श्रीकिशोर जाधव,सहाय्यक निर्मिती अधिकारी,श्री दिपक कुंभार,भांडार अधीक्षक तसेच श्री दिपक गलांडे, रवी औसेकर, चेतन वाल्मिकी,श्री चौळे उपस्थित होते. तसेच पाठ्यपुस्तक वाटपाचे नियोजन समग्र शिक्षा अभियान या कार्यालयामार्फत करण्यात येत असून त्या कार्यालयाचे श्री. सतीश भापकर,रउफ शेख,श्री. चंद्रकांत ठाकरे श्री.दत्तात्रय माळकर, श्री.सुनील राजुरे,श्री. गोविंद भोळे,श्री.योगिराज आमगे इत्यादी अधिकारी कर्मचारी सदर उपक्रमाचे नियोजन करत आहेत.




# राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी ग्रंथपाल संदीप केंद्रे मनीषा वराडे आशीद बनसोडे उपस्थित होते.

याप्रसंगी प्रथम संदीप केंद्रे यांनी संभाजी महाराज यांच्या बद्दल माहिती सांगितली व त्यानंतर शाळेचे रजिस्टर प्रवीण शिवणगीकर यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा प्रेरणादायी आढावा घेतला. तसेच प्रत्येकानी इतिहास वाचून आपल्या पुढील पिढीला ती विचार आत्मसात करण्यासाठी प्रेरित करावे. महाराजांच्या जन्म मृत्यू व जीवन या तिन्ही गोष्टीचा संगम त्यांनी उलगडून दाखवला जर आपल्याला काही करायचे असेल तर संभाजी महाराजांची सर्व गुण अवगत करून त्यातील विचार आत्मसात करून आपण जीवन जगू शकतो व पुढच्या पिढीला हा इतिहास सांगू शकतो.

# महाराष्ट्र सुवर्ण परिवाराकडून गुणवंत व मान्यवरांना समाज गौरव सन्मान

**सोलापूरी/प्रतिनिधी :** महाराष्ट्र सुवर्ण परिवार या राज्यव्यापी सुवर्णकारांच्या समूहाने पूर्वनियोजित भव्य मोफत सामुदायिक व्रतबंध कार्यक्रम २०२६ मध्ये समाजातील काही गुणवंत व्यक्तिमत्त्वांचा तसेच समाजसेवी मान्यवर व्यक्तींचाही सन्मानार्थ समाज गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे. तसेच नुकत्याच झालेल्या दहावी, बारावीच्या परीक्षेतील समाजातील प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या सर्व मुला मुलींनाही प्रोत्साहनार्थ आणि अभिनंदन म्हणून महाराष्ट्र सुवर्ण परिवारकडून विशेष प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. सदर कार्यक्रम हा या महिना अखेर पंढरपूर येथेच होणार असून याची निश्चित तारीख लवकरच कळवण्यात येईल. महाराष्ट्र सुवर्ण परिवार ने आयोजित केलेल्या या मोफत सामुदायिक व्रतबंध कार्यक्रमात उपनयन या हिंदू संस्कारातील आवश्यक सामुदायिक मोफत संस्कार कार्यक्रमात भाग घेऊ इच्छिणाऱ्या समाज बांधवांनी दि. २१ मे २०२६ पर्यंत आपल्या पाल्यांची नावे महाराष्ट्र सुवर्ण परिवार कडे पाठवावेत असे आवाहन सुवर्ण परिवाराचे प्रवर्तक, माजी कृषी अधिकारी व सूर्यराज आयुर्वेद प्रतिष्ठानचे संस्थापक श्री रत्नाकर वेदपाठक यांनी केले आहे.

# मच्छिमारांना साधनांच्या खरेदीसाठी ७५ टक्क्यांपर्यंत शासकीय अनुदान

**लातूर/प्रतिनिधी :** मच्छिमारीसाठी लागणाऱ्या साधनांच्या किमतीत दिवसेंदिवस मोठी वाढ होत असल्याने, गरीब मच्छिमारांना आपला व्यवसाय किफायतशीरपणे करता यावा, या उद्देशाने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सहकारी संस्थांच्या सभासदांना आणि वैयक्तिक क्रियाशील मच्छिमारांना मासेमारी साधनांच्या खरेदीवर अनुदान दिले जाणार असून, लातूर येथील मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी यासाठी इच्छुक लाभार्थ्यांकडून प्रस्ताव मागविले आहेत.

या योजनेमध्ये तयार मासेमारी जाळीसाठी २४ हजार रुपये प्रकल्प किंमत निश्चित करण्यात आली असून, ३० किलो जाळीसाठी अर्थसहाय्य दिले जाईल. तसेच नौका खरेदीसाठी लाकडी नौकेकरिता ६० हजार, स्टील नौकेसाठी ३० हजार, तर फायबर नौकेसाठी १ लाख २० हजार रुपयांची प्रकल्प मर्यादा ठरवण्यात आली असून, यामध्ये राखीव प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के आणि अराखीव प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के शासकीय अनुदान दिले जाणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचा सभासद किंवा वैयक्तिक क्रियाशील मच्छिमार असणे आवश्यक आहे. लाभार्थ्याने विहित नमुन्यातील अर्जासोबत प्रकल्प अहवाल, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, छायाचित्र, बँकेचे विवरणपत्र आणि खरेदीची जीएसटी पावती सादर करणे अनिवार्य आहे. जर लाभार्थी बँक कर्जाद्वारे किंवा स्वनिधीतून योजनेचा लाभ घेणार असेल, तर संबंधित बँकेचे शिफारसपत्र जोडणे आवश्यक आहे. कुटुंबातील इतर कोणत्याही व्यक्तीने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असल्यास संबंधित लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल, असे मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे. तरी पात्र मच्छिमारांनी लवकरात लवकर आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्यदलात अधिकारी पदासाठी तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

**लातूर/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १५ जून, २०२६ ते २८ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १४ जून, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे.

या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत. लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी ९ जून, २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे मुलाखतीसाठी हजर रहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून) सीडीएस-६७ कोर्सचे प्रवेशपत्र आणि त्यासोबत असलेल्या परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी.

प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याने लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. यासोबतच संबंधित पात्रता प्रमाणपत्रही आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी ईमेल (training.pctcnashikgmail.com), दूरध्वनी (०२५३-२४५१०३२) किंवा व्हॉट्सॲप (९१५६०७३३०६) द्वारे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात जयंती उत्सव समिती आणि कार्यालयाच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी सर्वप्रथम प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्रपणे अभिवादन केले.

यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. किसनाथ कुडके, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, डॉ. दत्ता करंडे, योगीराज माकणे, विनोद दाभाडे, सोपान सुतार, रमेश राठोड, अनिल उस्तुर्गे, श्रीशैल्य पाटील, अक्षय वारद, रंगनाथ लांडगे, अजय गायकवाड, योगेश मस्के आणि गुरुप्रसाद बिरादार यांची उपस्थिती होती.

हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. सिद्राम डोंगरगे आणि मुख्य समन्वयक प्रो. डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा संपूर्ण जीवनपट सांगितला. यावेळी प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांनी संपूर्ण आयुष्यभर आपल्या प्रजेच्या समृद्धीसाठी सातत्याने प्रयत्न केले. आपण आज त्यांच्या जयंती दिनी प्रशासनाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून आपले कर्तव्य पूर्ण करावे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# उद्योग भवनच्या व्यापाऱ्यांचे प्रश्न मार्गी लावणार: आ. अमित देशमुख

## लातूरचे उद्योग भवन म्हणजे शहराचे बीकेसी; रस्ते, नाली आणि पथदिव्यांचा मास्टर प्लॅन तयार करण्याचे मनपाला निर्देश

**लातूर/प्रतिनिधी:** गुरुवार दि. १४ मे २०२६ लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था (उद्योग भवन) ही वसाहत म्हणजे मुंबईतील बीकेसीप्रमाणे लातूरचे व्यापारी केंद्र आहे. येथील व्यापारी महापालिकेला कर भरून उत्पन्नाचा मोठा स्रोत निर्माण करतात, त्यामुळे त्यांना संरक्षण आणि सोयीसुविधा देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज येथे केले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवार दि. १४ मे रोजी सकाळी लातूर शहरातील उद्योग भवनयेथील लातूर अर्बन को-ऑप.बँकेच्या सभागृहात लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या.लातूर (उद्योग भवन) येथील व्यापाऱ्यांचीराज्य शासन व महापालिकास्तरावरील विविध विषयाच्या संदर्भातील आढावा बैठकसंपन्न झाली.



यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर जयश्री सोनकांबळे, स्थायी समितीचे सभापती सचिन बंडापल्ले, गटनेते विजयकुमार साबदे आयुक्त मानसी मीना, लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या.लातूर (उद्योग भवन)चे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, चेअरमन अशोक लोया, उपविभागीय अधिकारी रोहिणी नरे विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, नगररचनाकार महाजन,जिल्हा उद्योग केंद्राचे जनरल मॅनेजर निखिल पाटील, मधुर चित्ते, रामविलास लोया, हुकूमचंद कलंत्री, ईश्वरप्रसाद डागा, शुभदा रेड्डी, अभय शहा, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष एडवोकेट किरण जाधव, टेवेंटीवन शुगरचे व्हा.चेअरमन विजय देशमुख, नवनीत भंडारी, आदिनाथ सांगवे, दिलीप माने, केतन हलवाई, रमेश भुतडा, गणेश हेड्डा, एडवोकेट दासराव शिरुरे, केतन हलवाई, अंबुरे मॅडम, पवन नावंदर, प्राध्यापक शिवराज मोटेगावकर, मालपाणी, विठ्ठलराव चित्ते,अभिलाष बरबडे, भालचंद्र सोनकांबळे, वेंकटेश पुरी, आदिसह महानगरपालिका, उद्योग, महसूल, नगरविकास विभागाचे संबंधित अधिकारी लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या.लातूर (उद्योग भवन) येथील व्यापारी उपस्थित होते.

प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर अर्बन को- ऑप.बँकेतिल छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या. लातूर (उद्योग भवन) येथील व्यापाऱ्यांच्याराज्य शासन व महापालिकास्तरावरील विविध विषयाच्या संदर्भातील अडचणी लवकरच सोडवू असे सांगीतले. यावेळी आमदार अमित देशमुख यांनी बैठकीत उपस्थित अधिकाऱ्यांना महानगरपालिकेने या वसाहतीमधील रस्ते, नाली आणि पथदिव्यांचा विकास करण्यासाठी तातडीने मास्टर प्लॅन तयार करावा. लेआउट, गुंठेवारी आणि प्रॉपर्टी ओनर परवानगी यांसारखी महापालिकास्तरावरील सर्व कामे तात्काळ पूर्ण करावीत. राज्यातील अशा ५३ वसाहतींच्या संदर्भात सरकार धोरण तयार करत असून, लातूरमधील २८ एकर जमिनीचा प्रश्न आणि व्यापाऱ्यांच्या अडीअडचणी लवकरच सोडवू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. लातूर औद्योगीक वसाहत सहकारी संस्था मर्या. लातूर (उद्योग भवन)चे संस्थापक

अध्यक्ष प्रदीप राठी यांनी राज्य शासन व महापालिका, उद्योग महसूल नगररचनाकार विभागस्तरावरील विविध विषयाच्या संदर्भातीलअडीअडचणची प्रास्ताविक सादर करताना सविस्तर माहिती दिली.

# स्त्रियांच्या बोलीचा अभ्यास म्हणजे त्यांच्या अंतर्मनाचा शोध- डॉ. सुनीता सांगोले

**लातूर/प्रतिनिधी:** बोलीच्या समाजभाषावैज्ञानिक अभ्यासातून हाती येणारे निष्कर्ष हे केवळ भाषिक नसून सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे दर्शन घडवणारे असतात, असे प्रतिपादन प्रसिद्ध अभ्यासक डॉ. सुनीता सांगोले यांनी केले. महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था (मुंबई) आणि मराठी भाषा विद्यापीठ (रिद्धपूर, अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे ११ ते १३ मे दरम्यान आयोजित 'बोली अभ्यासक कार्यशाळेत' त्या बोलत होत्या.

'मराठीच्या बोलींचा भाषाशास्त्रीय अभ्यास' या सत्रात डॉ. सुनीता सांगोले यांनी स्त्रियांच्या बोलीवर विशेष भाष्य केले. त्या म्हणाल्या की, स्त्रियांच्या भाषेतील सूक्ष्म पदर शोधण्यासाठी संशोधकांनी शास्त्रीय दृष्टी ठेवणे आवश्यक आहे. बोलीचे नमुने संकलन, विश्लेषण आणि निष्कर्ष हे टप्पे कसे पार पाडावेत, याचे विवेचन त्यांनी यावेळी केले. सहभागी निरीक्षण ही पद्धत अचूक माहिती संकलित करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते, असेही त्यांनी नमूद केले. स्त्रियांच्या बोलीत समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून संशोधनाची सामाजिक उपयोगिता किंवा या संशोधनाचे महत्त्व विषद करताना डॉ. सांगोले यांनी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले.ग्रामीण भागातील मुलींना शिकवताना त्यांच्या बोलीचा विचार करून अध्यापन पद्धती ठरवणे सुलभ होते. लेखक आणि नाटककारांना स्त्री-पात्रांचे संवाद अधिक जिवंत आणि वास्तववादी लिहिण्यासाठी या संशोधनाची मदत होते. समाजातील स्त्री-पुरुष सत्तासंबंध आणि बदलत्या सामाजिक मूल्यांचे दर्शन या अभ्यासातून घडते. तसेच स्त्रियांच्या बोलीतून त्यांची सामाजिक 'स्थिती-गती' समजते, ज्याचा उपयोग शासनाला ध्येयधोरणे ठरवण्यासाठी होतो. यावर लक्ष वेधले.




या सत्रात डॉ. सोनल कुलकर्णी यांनी 'बोली अभ्यास बृहतप्रकल्प' राबवताना आलेले अनुभव कथन केले आणि संशोधन पद्धतीवर मार्गदर्शन केले. तसेच डॉ. फुला बागूल यांनीही बोली अभ्यासाच्या शास्त्रीय पद्धतीवर आपले विचार मांडले.

या कार्यशाळेस महाराष्ट्रातील नामवंत बोली अभ्यासक, संशोधक, साहित्यिक, कलाकार आणि शब्दकोशकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. बोली भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी दिशा देणाऱ्या या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी अभ्यासकांनी महाराष्ट्र शासनाचे व आयोजकांचे आभार मानले.

# देऊळवाडीच्या युवकांनी इतिहास घडविला-जि. प. माजी अध्यक्ष राहुल केंद्रे

**नळेगाव/अजगर मजकुरी:** शेतकऱ्यांच्या घरातून थेट खाकीपर्यंत; देऊळवाडीच्या चार लेकरांनी पीएसआय बनत जिल्ह्यात घडवला सुवर्णइतिहास! मा.जि.प.अध्यक्ष राहुल केंद्रे ही चार मुलं नाहीत, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या जिद्दीचे जिवंत प्रतीक आहेत.

देऊळवाडीच्या या चार युवकांनी केवळ परीक्षा पास केलेली नाही, तर संघर्षावर मात करत संपूर्ण ग्रामीण भागाला नवी दिशा दिली आहे. ही चार मुले नाहीत, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या जिद्दीचे जिवंत प्रतीक आहेत. शेतकऱ्यांच्या घरातून आलेली ही लेकरे आज खाकी वर्दीत झळकत आहेत, ही प्रत्येक गावासाठी प्रेरणादायी बाब आहे.शेतकऱ्यांच्या घरातून थेट खाकीपर्यंत... देऊळवाडीच्या चार लेकरांनी पोलीस उपनिरिक्षक बनत जिल्ह्यात सुवर्णइतिहास घडविला आहे. आसे मत माजी जि.प.अध्यक्ष राहुल केंद्रे यांनी देऊळवाडी ता.उदगीर येथील गावातील चार पोलीस तरुणांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरिक्षक विभागीय परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केल्याबद्दल आयोजित



सत्कार कार्यक्रमाच्या प्रसंगी बोलत होते.

देऊळवाडी ग्रामस्थांच्या वतीने चारही युवकांचा भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हापरिषदेचे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर बिरादार, माजी पंचायत समिती सभापती ब्रम्हाजी केंद्रे, माजी पंचायत समिती उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, पंचायत समिती सदस्य धनराज नादरगे, शाम डावळे, प्रशांत गायकवाड, सरपंच शुभम केंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. देऊळवाडी येथील प्रल्हाद अण्णाराव केंद्रे, ज्ञानेश्वर नामदेव केदार, नामदेव गोपीनाथ कोळगीर आणि दत्तात्रय हनुमंत केंद्रे या चार युवकांची झडख पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावभर काढलेल्या या विजयी मिरवणुकीत ग्रामस्थांनी चारही अधिकाऱ्यांवर पुष्पवृष्टी करत जल्लोष साजरा केला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते फेटे बांधून त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना राहुल केंद्रे म्हणाले, देऊळवाडीच्या या चार युवकांनी केवळ परीक्षा पास केलेली नाही, तर संघर्षावर मात करत संपूर्ण ग्रामीण भागाला नवी दिशा दिली आहे. ही चार मुलं नाहीत, तर ग्रामीण महाराष्ट्राच्या जिद्दीचे जिवंत प्रतीक आहेत. शेतकऱ्यांच्या घरातून आलेली ही लेकरं आज खाकी वर्दीत झळकत आहेत, ही प्रत्येक गावासाठी प्रेरणादायी बाब आहे.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून या युवकांनी अथक मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवले आहे. आज अनेक युवक नैराश्याच्या गर्तेत अडकताना दिसतात; मात्र देऊळवाडीच्या युवकांनी मेहनत आणि शिक्षणाच्या बळावर नवा इतिहास घडवला आहे. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील हजारो तरुणांच्या डोळ्यांत नवी स्वप्नं पेटतील. विशेष म्हणजे, एका गावातून एकाच वेळी चार झडख अधिकारी बनल्याने देऊळवाडी गावाची ओळख आता संपूर्ण जिल्ह्यात प्रेरणास्थान म्हणून निर्माण झाली आहे. हा सत्कार सोहळा देऊळवाडी गावासाठी अभिमान, प्रेरणा आणि इतिहास घडवणारा क्षण ठरला. आसे ते म्हणाले यावेळी मोठयाप्रमाणावर ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रा.डॉ.बालाजी शिंदे यांना भारत सरकारकडून कॉपीराईट मंजूर



**लातूर/प्रतिनिधी:** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयातील मराठी विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. बालाजी शिंदे यांनी भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाकडे मराठी भाषा, साहित्य आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती या विषयावरील कलाकृतीचे सादरीकरण केले होते. त्यांच्या या नावीन्यपूर्ण सृजनशील कलाकृतीसाठी भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाकडून कॉपीराईट मंजूर करण्यात आले व अधिकृत कॉपीराईट प्रमाणपत्र त्यांना प्रदान करण्यात आले आहे. हे त्यांचे कार्य त्यांच्या साहित्यिक प्रतिभेची, संशोधननिष्ठेची आणि मराठी भाषा - संस्कृतीप्रती असलेल्या समर्पणाची गौरवशाली पावती आहे.डॉ.बालाजी शिंदे व यादव मोरे यांनी केलेले संशोधन मराठी भाषा शिकण्यासाठी व संवादाच्या सुलभतेसाठी उपयुक्त ठरणार आहे.

या त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ.राम बोरगावकर,प्राचार्य डॉ.पांडुरंग गोरे,प्रा.डॉ. वसंत बंडे, प्रा. रवि चव्हाण,डॉ. सुदाम पवार, प्रा.तुकाराम येमले,प्रा.श्रीमंत दोरवे,श्री.शशिकांत सोळुंके,डॉ.संतोष कुलकर्णी , प्रा. अमोल जाधव,डॉ. मोनालिसा खानोरकर,श्री.कोंडीराम कागले यांनी त्यांच्या या नाविन्यपूर्ण संशोधनाचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## परिक्षा कुणाची ?

वादाच्या भोव-यात
रे नीट प्रवेश परिक्षा
शिक्षण संस्था ग्रस्त
देणारं कसली दिक्षा

कुंपणचं खाता शेत
काय ठेवालं अपेक्षा
अधिक भयावह हा
इलाज व्याधी पेक्षा

विद्यार्जन भविष्याचे
आकुंचित करे कक्षा
गल्लभरु क्लासेस रे
कशीदेणार ती दिक्षा

कोण खरा जिम्मेदार
कशी कराल समिक्षा
विद्यार्थीअभ्यासू खरे
गवसणी घाले लक्ष्यां

काय पाप कशी चूक
भक्ष्य रे कपाळमोक्षा
गहाणपडते अक्कल
कशी मिटवी दुर्भिक्षा

लुटारुनिघाले तेचं ते
करावीज्यांनी सुरक्षा
डागाळे विद्यार्थीदशा
कसली क्रौर्यी उपेक्षा

भस्मासूर अवतार हा
कशीभागवेलं बुभुक्षा
वृध्दींगत होई हव्यास
कमी ना होई व्यपेक्षा

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.




# लक्ष्मी अर्बन बँकेस बेस्ट डिजिटल बँक पुरस्कार प्रदान

**लातूर/प्रतिनिधी:** सहकार व बँकिंग या वित्तिय क्षेत्रात उत्तमपणे दर्जेदार सेवा देणाऱ्या सहकारी बँकेस देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील मानाचा बेस्ट डिजिटल बँक हा पुरस्कार लक्ष्मी अर्बन को-ऑप. बँक लि, लातूर या बँकेस मिळाला आहे.

नागरी सहकारी बँक टियर २ गटातील प्रथम पुरस्कार लक्ष्मी अर्बन को-ऑप. बँक लि, लातूर बँकेस महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशन लि, मुंबई व क्रेष्ट इन्फोमिडिया यांच्यातर्फे आयोजित १० व्या अखिल भारतीय अर्बन को-ऑप. बँक संमेलनामध्ये क्रेष्ट इन्फोमिडिया चे सीईओ मा. श्री. गौतम नवीन व सिंगटेक अँड ग्रुप ऑफ कंपनीचे सीईओ व कार्यकारी संचालक मा.श्री. सुजित सिंग यांच्या हस्ते दिनांक ०९ मे २०२६ रोजी हॉटेल दि वेस्टीन कोरेगाव पार्क, पुणे येथे प्रदान करण्यात आला.

यावेळी पुरस्कार स्विकारण्यासाठी बँकेचे व्हा. चेअरमन श्री सतीशजी भोसले, तज्ञ संचालक सीए श्री राजेशजी अग्रवाल, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अविनाशजी आळंदकर, आयटी अधिकारी श्री सुहास राजमाने उपस्थित होते.

सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट बँकांना त्यांच्या कार्यास प्रोत्साहन मिळावे या अनुषंगाने हा पुरस्कार दिला जातो. सदरील पुरस्कार बँकेस मिळणे हे अभिमानास्पद आहे. सदर पुरस्कारासाठी तज्ञ समितीने बँकेच्या कार्याचे मूल्यांकन करून निवड केली आहे.

लक्ष्मी अर्बन बँकेच्या संचालक मंडळ व बोर्ड ऑफ मॅनेजमेंट ने अतिशय नियोजनबध्द पध्दतीने बँकेचे अधुनिक डिजीटल बँकिंग मध्ये रुपांतर केले आहे. लक्ष्मी अर्बन बँक हि सहकारी बँकामधील लातूर जिल्ह्यातील संपूर्ण डिजीटल सेवा सुरू करणारी पहिली बँक आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या मार्गदर्शन सूचना व सहकार विभागाच्या सर्व नियमांचे पालन करून लक्ष्मी अर्बन बँकेने अतिशय प्रेरणादायी वाटचाल केली आहे. आज बँकेकडे णझख, खचझड, चेलळश्रश इरपज्ञळपस App, ATM Card, QR Code, NACH, BBPS,DBT, Franking अशा अधुनिक सुविधा कार्यान्वित आहेत. या सुविधांचा लाभ बँकेच्या हजारो ग्राहकांना होत आहे.

या यशस्वी वाटचालीत सभासद, ग्राहकांची मोलाची साथ व बँकेच्या कर्मचारी वर्गाने संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली केलेले काम तसेच बँकेचे स्थानिक सल्लागार, पिग्मी प्रतिनिधी व हितचिंतक यांच्या सहकार्यामुळे बँकेस राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार प्राप्त झाला असल्याचे मत, बँकेचे चेअरमन अशोक अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

श्री अशोक अग्रवाल यांनी संचालक मंडळ, सभासद, ग्राहक, कर्मचारी, पिग्मी प्रतिनिधी व हितचिंतक यांचे अभिनंदन केले आहे.

# आदर्श मैत्रीच्या सत्कारामुळे आदर्श विद्यार्थी घडावेत - आ. विक्रम काळे

**लातूर/प्रतिनिधी:** आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या वतीने नुकत्याच झालेल्या इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी, गुणवंत विद्यार्थ्यांचा हा सन्मान म्हणजे भविष्यात आदर्श विद्यार्थी आणि देशाचे आदर्श नागरिक घडविण्यासाठीची कौतुकाची थाप आहे, असे प्रतिपादन केले.




या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून लातूर शहरातील सुप्रसिद्ध उद्योजक दिलीप माने उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश संपादन करता येते, असे सांगितले. तसेच कोणतेही काम करताना कमीपणा वाटून घेऊ नये, आई-वडील, कुटुंब आणि देशाप्रती सकारात्मक भावना ठेवून आदर्श नागरिक बनावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उद्योजक तुकाराम पाटील तसेच पत्रकार शशिकांत पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी म्हणून निलेश राजेमाने व विवेक सौताडेकर यांनी आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या रुग्णसेवा, शेतकरी मदत, विद्यार्थ्यांसाठीचे उपक्रम आणि सर्वसमावेशक सामाजिक कार्याचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचा हा सन्मान सोहळा भविष्यात प्रेरणादायी ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आदर्श मैत्री फाऊंडेशनच्या कार्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे अध्यक्ष संतोष बिराजदार यांनी केले. त्यांनी गेल्या सोळा वर्षांपासून फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात असल्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांसाठी सायकल बँक, गुणवंत विद्यार्थी सत्कार, शैक्षणिक मदत, शेतकरी सहाय्य तसेच वंचित कुटुंबांसाठी विविध मदतकार्य सातत्याने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. नामांकित व्यक्तींच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रेरणा देण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी बारावीतील गुणवंत विद्यार्थी कु. हर्षदा होनराव, कु. यशस्वी बिराजदार, कु. आस्था इटकर, प्रशांत क्षीरसागर, आनंद ढगे तसेच गएए -वींरपलशव टॉपर पृथ्वीराज ढिकाने यांच्यासह इयत्ता दहावीतील मधुराज चिटणीस, प्रणव फड, प्राजक्ता रावळे, मानसी चव्हाण, अवधूत कुलकर्णी, सोहम पांचाळ, साहस सौताडेकर, हर्षाली शिंदे, विद्या कोकणे, सई सूर्यवंशी, महेंद्र प्रताप जाधव, श्रुती जगदाळे, अनाम शेख, विराज राजेमाने, विशाल जाधव, दिव्यांक सोनटक्के, तन्मय मुंजाळ, स्वराज पाटील, आयान शेख आदी विद्यार्थ्यांचा पालकांसह सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमास आदर्श मैत्री फाऊंडेशनचे संचालक सच्चिदानंद ढगे, ओमप्रकाश झुरळे, प्रमोद भोयरेंकर, सोनू डगवाले, आसिफ शेख, शशिकिरण भिकाने, दयानंद पाटील, संपत जगदाळे, प्रवीण सूर्यवंशी, अमोल माने, मदन भगत यांच्यासह अनेक शिक्षक, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशश्री बिराजदार यांनी केले तर आभार प्रदर्शन ओमप्रकाश झुरळे यांनी मानले.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade	Mo. 9422472502,	RNI 47034/64,	POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.	मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२	आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६